 आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३०६ । पृष्ठे ८ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) 

### शहरात तीन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा

**अलिबाग :** पोयनाड येथे जलवाहिनी दुरुस्तीसाठी एमआयडीसीने शुक्रवार, दि. १२ एप्रिल रोजी शट डाऊन घेतला आहे. त्यामुळे अलिबाग शहराला होणारा पाणीपुरवठा शुक्रवारी सायंकाळी बंद ठेवण्यात येणार आहे. तर, शनिवारी पाणीपुरवठा असुरळीत राहील, तसेच पुढील तीन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे, अशी माहिती नगरपरिषद प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तरी, शहरातील नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, अपव्यय करू नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

रायगड, शुक्रवार, दि. १२ एप्रिल २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

### 'खडसेंना राष्ट्रवादीत घेऊन चूक केली'

**मुंबई :** जळगाव जिल्ह्यातील भाजप नेते व मंत्री गिरीश महाजन आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या वादानंतर एकनाथ खडसे यांनी भाजपला रामराम ठोकला होता. त्यावेळी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार यांनी प्रवेश दिला होता. त्यानंतर विधान परिषदेवर आमदार केले होते. आता खडसे पुन्हा भाजपात जात आहेत. यामुळे खडसे यांना राष्ट्रवादी पक्षात घेणे, ही आपली मोठी चूक असल्याचे शरद पवार यांनी मान्य केल्याचा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री डॉ. सतीश पाटील यांनी केला आहे.




- विद्यार्थी, पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण
- विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती
- प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

## आरसीएफची शाळा सुरु राहणार?

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेली आरसीएफ कंपनीची शाळा बंद होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आरसीएफ कंपनीने पुढाकार घेऊन हा प्रश्न मार्गी लावल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळणार आहे. आरसीएफ कंपनी थळ या ठिकाणी उभारण्यात आली. त्यानंतर कुरुळ परिसरात आरसीएफ कर्मचारी वसाहत बांधण्यात आली. कंपनीतील कर्मचारी, स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या मुलांसह ग्रामीण भागातील मुलांसाठी डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचलित आरसीएफ स्कूल या परिसरात उभारण्यात आली. गेल्या ४२ वर्षांपासून आरसीएफ कर्मचारी वसाहतीच्या आवारात ही शाळा आहे. या शाळेतून अनेक विद्यार्थी घडले आहेत. राज्य, देश पातळीवर या शाळेतील विद्यार्थ्यांनी नावलौकिक प्राप्त केला आहे.

अलिबाग तालुक्यातील सुडकोलीपासून रेवस परिसरातील अनेक विद्यार्थी आरसीएफ स्कूलमध्ये शिकण्यास येतात. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून ही शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटीने याबाबत आरसीएफ कंपनीला पत्र दिल्याचे सांगण्यात आले आहे. या निर्णयामुळे आरसीएफ स्कूलमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांमध्ये निर्माण झाली आहे. आरसीएफ शाळा बंद होऊ नये या भूमिकेत पालक आहेत. अलिबागमध्ये पालक व कंपनीच्या पान २ वर

> डेक्कन एज्युकेशन सोसायटीने आरसीएफ समवेत शाळा सुरु ठेवण्याबाबत असमर्थता दाखविली आहे. आरसीएफ स्वतः शाळा चालवू शकत नाही. मात्र, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कंपनी प्रशासन प्रयत्न करीत आहे. आणखी दोन वर्षे सोसायटीने शाळा सुरु ठेवावी. त्या कालावधीत पुढील कार्यवाही करण्याबाबत कंपनी निर्णय घेईल.
>
> – संजीव हरळीकर, महाव्यवस्थापक, आरसीएफ कंपनी, थळ




उन्हाळ्याची सुट्टी
AI शी गट्टी
चला करूया MS-CIT!
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

**आजचा अग्रलेख**
पुतणे केविलवाणे

**वे|ध|क**

### स्कूल बस उलटली, सहा विद्यार्थी ठार

**नवी दिल्ली :** हरियाणाच्या महेंद्रगड येथे भीषण अपघात झाला असून, यामध्ये सहा विद्यार्थ्यांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे. तर, १५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. सकाळच्या सुमारास स्कूल बस उलटून ही मोठी दुर्घटना घडली. महेंद्रगडच्या उन्हानी गावात हा भीषण अपघात झाला. मुलांना शाळेत घेऊन जाणारी स्कूल बल उलटून हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी क्रेनच्या मदतीने बसला सरळ केलं. हा अपघात कसा झाला याचा तपास पोलीस करत आहेत. जेव्हा ही बस उलटली, तेव्हा बसमध्ये ४० विद्यार्थी असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ईदची शासकीय सुट्टी असूनही महेंद्रगडची जीएल पब्लिक स्कूल आज सुरु होती. त्यामुळे पालकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, अपघातानंतर बचावकार्य तात्काळ सुरू करण्यात आले. जखमी विद्यार्थ्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# नार्वेकरांविरोधात तक्रार; चौकशी करणार

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या विरोधात आचारसंहितेचा भंग केल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे. याप्रकरणी तपास करुन निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

काहीच दिवसांपूर्वी अलिबागचे नाव बदलून मायनाक नगरी करावे, अशी शिफारस नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एका पत्राद्वारे केली होती. त्यामुळे अलिबागकरांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला होता. जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या कालावधीत अशी शिफारस करुन भंडारी समाजाला खुश करण्याचा प्रकार असून, तो आचार संहितेचा भंग करणारा आहे. मतांचे ध्रुवीकरण करुन जाती-धर्मामध्ये नार्वेकर तेढ निर्माण करत आहेत. याविरोधात अलिबाग येथील ॲड. राकेश पाटील यांनी नार्वेकर यांच्याविरोधात जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करत कारवाईची मागणी केली आहे. तसेच दोन दिवसांपूर्वी स्थानिक आमदारांनी विकासकामांचे भूमीपूजन केल्याने आचार संहितेचा भंग झाला आहे. याप्रकरणी आपण सुमोटो (स्वाधिकार) तक्रार दाखल करणार का, असा प्रश्न जावळे यांना पत्रकारांनी विचारला असता, याबाबत कोणाची तक्रार आल्यास चौकशी करण्यात येईल, असे सांगितले.

**जिल्ह्यात आचार संहिता भंग केल्याच्या आतापर्यंत २५ तक्रारी आल्या होत्या. पैकी १५ तक्रारींवर कारवाई करण्यात आली आहे, तर १० तक्रारींमध्ये तथ्य आढळले नाही, असे जावळे यांनी स्पष्ट केले.**



## आमदारांचे पळपुटे धोरण?

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत भूमीपूजन कार्यक्रम करणे आचारसंहितेचा भंग आहे, हे माहिती असतानादेखील आ. महेंद्र दळवी यांच्या हस्ते भूमीपूजन सोहळा नुकताच करण्यात आला. याबाबत दैनिक कृषीवलने आवाज उठवून सदरची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. या बातमीने राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. 'आमदारांकडून आचारसंहितेचा भंग' या मथळ्याखालील कृषीवलच्या बातमीची माहिती एका कार्यकर्त्याने आ. दळवी यांना अलिबाग येथील एका कार्यक्रमात दिली. त्यावेळी तक्रार झाल्यास भूमीपूजनाचा व्हिडीओ हा जुना असल्याचे सांगेन, असे दळवी यांनी संबंधित कार्यकर्त्याला सांगितल्याचे दिसून आले.



**तक्रार झाल्यास जुना व्हिडीओ असल्याचे सांगेन**

अलिबाग तालुक्यातील वेश्वी परिसरात निवडणुकीच्या कालावधीत भूमीपूजन करून आचारसंहितेचा भंग आ. दळवी यांच्याकडून करण्यात आला. मात्र, याकडे आचारसंहिता समितीकडून दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले आहे. नेमण्यात आलेल्या समितीला काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी करूनदेखील त्याकडे समितीचे दुर्लक्ष झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे रायगडचे जिल्हाधिकारी समितीविरोधात काय भूमिका घेणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

रायगड लोकसभा निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडावी, तसेच आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या समितीच्या पान २ वर

> **आचारसंहितेच्या कालावधीत लोकप्रतिनिधींकडून विकासकामांचे मतदारांना प्रलोभन दाखवून भूमीपूजन करण्यात येत असताना आचारसंहिता समितीकडून दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले. त्यामुळे आता जिल्हाधिकारी काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा जागते रहो!

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील आंबेनळी घाटातील रायगड पोलीस विभागातर्फे रात्रंदिवस नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करताना लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातून उतरणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यासाठी रायगड पोलीस विभागातर्फे नाकाबंदी करण्यात आली आहे. या तपासणी नाक्यावर दोन बॅरिकेट्स उभे करून पान २ वर



**तालुक्यात रात्रंदिवस नाकाबंदी, कडेकोट बंदोबस्त**

## डॉ. विजय गवळी एलसीबीच्या जाळ्यात

### लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण उपजिल्हा रुग्णालयाचे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय एकनाथ गवळी यांना भ्रष्टाचारप्रकरणी बुधवार, दि. १० एप्रिल रोजी ताब्यात घेण्यात आले आहे. डॉ. विजय एकनाथ गवळी यांना १९ सप्टेंबर २०१८ ला पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे तत्कालीन पोलीस निरीक्षक विवेक जोशी आणि किरणकुमार बकाळे यांच्या पथकाने ताब्यात घेतले होते. त्यावेळी त्यांच्या घराची झाडाझडती केली असता २३ लाख ९६ हजारांची रोख रक्कम सापडली होती. या चौकशीअंती १ कोटी ५२ लाख ४० हजार ५३० एवढी अपसंपदा संपादित केल्याचे आढळून आले असून, ही अपसंपदा त्यांच्या उत्पन्नापेक्षा ४४.५६ टक्के जास्त आहे.



दरम्यान, डॉ. गवळी यांच्या मालमत्तेचा शोध घेतल्यावर अनेक बाबी समोर आल्या. त्यामध्ये कोल्हापूर, पुणे, पनवेल, खारघर, पेण याठिकाणी सदनिका जमीन व गाळे असल्याचे उघडकीस आले होते. यामध्ये कोल्हापूरमध्ये दोन ठिकाणी जमीन व एक सदनिका, खारघरमध्ये एक सदनिका, पनवेलमध्ये एक सदनिका, पुण्यामध्ये एक सदनिका, तर पेणमध्ये दोन गाळे, दोन ठिकाणी जमीन अशा एकूण दहा ठिकाणी मालमत्तेची माहिती त्याठिकाणी उपलब्ध झाली. गेली सहा वर्षे डॉ. विजय पान २ वर

## पशुधन वाऱ्यावर




- डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांची वानवा
- १५ पदांपैकी १० पदे रिक्त

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यात पशुसंवर्धन विभागात डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांची वानवा आहे. विविध मंजूर १५ पदांपैकी तब्बल १० पदे रिक्त आहेत. चिंतेची बाब म्हणजे, पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या चारपैकी चारही जागा रिक्त आहेत. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताणदेखील येत आहे.

सुधागड तालुका डोंगराळबहुल तालुका असून, १०० महसूल गावे आहेत. गावासह येथील वाड्यांमध्ये बहुसंख्य लोकांकडे गुरांचा गोठा आहे. याशिवाय अनेक जण शेळी, मेंढ्या, कोंबड्या आदींचे पालन करतात. मात्र, पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, वर्णोपचारक, परिचर अशी अनेक पदे रिक्त असल्याने अशा परिस्थितीत या सर्व जनावरांवर व प्राण्यांवर योग्य प्रकारे उपचार व लसीकरण करता येत नाही. तर अनेक गुरे योग्य व वेळीच उपचार न मिळाल्याने दगावली आहेत. यासंदर्भात अनेकदा शेतकरी संघटनेने आवाज उठवला होता. परंतु, पान २ वर

> रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता. पदे भरण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. काही महिन्यात त्याची मंजुरी मिळून डॉक्टर व इतर कर्मचारी दाखल होतील.
>
> – लता मोहिते, गटविकास अधिकारी




● मुरुड येथे नवाबकालीन ईदगाहवर ईदची पहिली नमाज अदा करण्यात आली. यावेळी हजारो मुस्लिम बांधव उपस्थित होते. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी २० तासांचा अवधी

# आजपासून सुरुवात, ७ मे रोजी मतदान

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**१२ ते १९ एप्रिल या कालावधीत लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. आठ दिवसांच्या कालावधीत तीन सरकारी सुट्ट्या आहेत. त्यामुळे उमेदवारांकडे अर्ज दाखल करण्यासाठी पाचच दिवस आहेत. ११ ते ३ या वेळेत फक्त २० तासांचा अवधी उमेदवारांना मिळणार आहे.** पान २ वर



- दि. १२ ते १९ एप्रिलदरम्यान अर्ज स्वीकारणार
- जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

येत्या ७ मे रोजी मतदान होत असून, संपूर्ण जिल्ह्यातील २३ लाख १६ हजार ५१५ मतदारांची यादी २३ जानेवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत निवडणूक आयोगाकडून सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या निवडणुकीचा कार्यक्रम सुरू झाला असून, नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी सर्वसाधारण सूचना करण्यासाठी दिनांक, वेळ, ठिकाण आणि इतर आवश्यक बाबीची माहिती राजकीय पक्षांची बैठक घेऊन देण्यात आली आहे. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यात आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यामधील दापोली व गुहागर विधानसभा क्षेत्राचा रायगड मतदारसंघात समावेश होतो. त्यातील मतदारांसह मतदार संघामध्ये एकूण १६ लाख ५३ हजार ९३५ मतदार आहेत. मतदान दिवशी मतदान प्रक्रियेचे लाईव्ह वेबकास्टिंग केले जाणार आहे.

निवडणुकीबाबतची नियम ३ मधील नमुन्याची निवडणुकीची सूचना १२ एप्रिल रोजी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्यात येणार आहे. याची प्रसिध्दी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह सहाय्यक निवडणूक निर्णय पान २ वर

## उमेदवारी अर्ज दाखल करताना सूचनांचे पालन करावे

### जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

लोकसभा मतदारसंघासाठी १२ एप्रिलपासून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास प्रारंभ होत आहे. सर्व उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करताना भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सर्वसाधारण सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, खर्च पथक प्रमुख राहुल कदम, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे तसेच विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले की, नामनिर्देशनपत्र निवडणूक अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीत स्वीकारले जाणार आहेत. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारले जाणार नाहीत. १२, १५, १६, १८, १९ एप्रिल या दिवशी ११ ते ३ या वेळेत स्वीकारले जाणार आहेत. एका उमेदवारास अधिकाधिक चार नामनिर्देशनपत्र पान २ वर

### पाच व्यक्तींना प्रवेश

**नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात उमेदावारासहीत एकूण पाच व्यक्तींनाच प्रवेश दिला जाईल. (त्यामध्ये उमेदवार व त्यांचे चार प्रतिनिधी यांनाच प्रवेश देण्यात येईल.) तसेच उमेदवाराच्या केवळ तीन वाहनांना कार्यालयाच्या परिसरात प्रवेश देण्यात येणार आहे. वाहने वाहनतळावरच उभी करण्याची अनुमती राहील. उमेदवार हा ज्या लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहे त्याच लोकसभा मतदारसंघातील मतदार हे प्रस्तावक असणे बंधनकारक राहील.**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ एप्रिल

१) श्रीम. आशा गणेश जगताप
अलिबाग, १२-४-१९४५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**चि. कियुष्का हर्षल साष्टे, वाढदिवस, वेश्वी,अलिबाग**



**स्व. लक्ष्मीबाई नागेश नागवेकर, स्मरणार्थ, कोल्हापूर**

# उरणच्या 'ऑक्सिजन पार्क'चे झाले नंदनवन

**रानपाखरे घेताहेत फळाफुलांचा मनसोक्त आस्वाद**



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण पूर्व विभागातील कोमणादेवी येथील उजाड माळरानावर सारडे विकास मंचाच्या वतीने वनराई फुलविली असून, या वनराईला ऑक्सिजन पार्क असे नाव देण्यात आले आहे.

सारडे विकास मंचाचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आंबा, जांभुळ, काजू, पेरू, रांजण, शिवण, बांबू, भोकुरण, सीताफळ, निलगिरी, लिंबू, फणस, बोर, चिंच, तुळस, चाफा अशा विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. त्यामुळे येथील कोमणादेवीच्या उजाड माळरानाचे नंदनवन बनले आहे. या झाडांच्या लागवडीला आता दहा वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे येथील बहुतांशी झाडे फळाफुलांनी बहरली असून, परिसरातील रानपाखरे येथील झाडांवर आलेल्या फळांचा मनसोक्त आस्वाद घेत असतानाचे चित्र येथे पाहायला मिळत आहे.

सकाळ संध्याकाळ येथे होणारा या रानपाखरांचा किलबिलाट कानांना तर तृप्त करतोच. परंतु मनाला एक वेगळाच आनंद देतो. या झाडांची देखभाल करण्याची जबाबदारी सारडे विकास मंचातर्फे घेण्यात आली आहे. दरम्यान, या झाडांना उन्हाळ्यात पाणी आणि पावसाळ्यात मातीची भरणी यासाठी येणारा जो खर्च आहे; त्या खर्चाची, आर्थिक बाजू प्रसाद पाटील आणि स्वाती पाटील हे दाम्पत्य गेल्या सात वर्षांपासून सांभाळत आहेत. आणि यापुढेही तेही जबाबदारी सांभाळणार आहेत. सध्या उन्हाळा सुरू असून, महिला मजुरांमार्फत या झाडांना पाणी देण्याचे काम सुरू आहे. या निसर्गरम्य कोमणादेवी ऑक्सिजन पार्कला तालुक्यातील अनेक पर्यटक नागरिक भेटी देत असून, या अल्हाददायक निसर्गाच्या वातावरणात हे पर्यटक रममाण होत आहेत. या निसर्गरम्य नंदनवनात विविध प्रजातीचे पशुपक्षी पर्यटकांना येथे पाहावयास मिळत असल्याचे बोलले जात आहे, त्यामुळे पर्यटक या कोमणादेवी ऑक्सिजन पार्कला नेहमीच भेट देत असल्याचे निदर्शनास येत आहे.

# पोशीर नदी आहे कुठे?

## बोरगाव ग्रामस्थांचा सवाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ठाणे जिल्ह्यातील महानगरांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कर्जत तालुक्यात मोठे धरण बांधले जाणार आहे. मात्र, ते धरण पोश्री नदीवर बांधले जाणार असून, कोकण पाटबंधारे महामंडळ यांच्याकडून पोशीर धरण बांधले जाणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र, पोशीर नदी कर्जत तालुक्यात आहे कुठे, असा प्रश्न प्रस्तावित धरणाच्या कामामुळे विस्थापित होऊ शकतील अशा बोरगाव ग्रामस्थांनी शासनाला विचारला आहे. दरम्यान, आम्हाला धरण नको आहे, असा पवित्रा बोरगाव आणि चई ग्रामस्थ यांनी घेतला आहे.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडून कर्जत तालुक्यात धरण बांधण्याचा प्रस्ताव गेली २० वर्षे पुढे केला जात आहे. मात्र, अनेक वर्षे ही केवळ चर्चा असून, आता मात्र कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने अधिसूचना जारी केली आहे. कर्जत तालुक्यातील पोशीर नदीवर हे धरण बांधले जाणार असून, तेथील तीन गावे विस्थापित होणार आहेत.ठाणे जिल्ह्यातील महानगरे यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी पोशीर धरण बांधण्याचे शासनाचे नियोजन आहे. मात्र, कर्जत तालुक्यात पोशीर नदी आहे कुठे? असा प्रश्न कर्जत तालुक्याला पडला आहे.

# मुरुडमध्ये कलिंगडांची आवक वाढली

**माणगाव तालुक्यातील कलिंगडे बाजारपेठेत दाखल**



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

थंडीत पडणाऱ्या दवावर कलिंगडचे पीक तयार होते. जिल्ह्यात प्रथमच थंडी जास्त पडल्याने मागील वर्षापेक्षा जास्त पीक तालुक्यात तयार झाल्याने कलिंगडची आवक वाढली आहे.

बाजारात कलिंगडची विक्री अल्प प्रमाणात होत असल्याने तसेच बाजार भाव मिळत नसल्याने माणगाव तालुक्यातील बोरघर गावातील शेतकरी आपल्या मळ्यातील गावठी कलिंगडे टेंपोमधून विक्री करीत मुरुड बाजारपेठेत आण्यात आली आहे.

उन्हाळा सुरु झाला की बाजारात कलिंगडला मागणी वाढते. हा कलिंगड शुगर किंग नावाने ओळखली जातात.

नावाप्रमाणेच त्यांची चवही साखरेसारखी असते. फिक्कट हिरवा कलर असणारी गोल आकाराची छोटी-मोठी कलिंगड फ्रुड सलाट व ज्युस बनविण्यासाठी ही कलिंगड मोठ्या प्रमाणात वापरली जातात. सध्या आवक वाढल्याने कलिंगड छोटे २० तर मोठे कलिंगड ५० रुपये दर मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

## अपूर्वा हॉटेलजवळून दुचाकीची चोरी

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये चांभार्ली येथील अपूर्वा हॉटेलशेजारील गोंधळी बिल्डींगच्या खालील पार्किंगमधून दुचाकी चोरीची घटना घडली. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात श्रवणकुमार मिठालाल परदेशी (४३, रा. गोंधळी बिल्डींग, रूम नं. ३०४, व्यवसाय लॉन्ड्री) यांनी गोंधळी बिल्डींगच्या पार्किंगमध्ये एमएच ४६ क्यू ५९८३ या नंबरची हिरोहोंडा पॅशन प्रो मोटारसायकल दहा हजार रूपये किमतीची कोणीतरी अज्ञात इसमाने स्वतःच्या फायद्याकरिता लबाडीच्या इराद्याने चोरून नेली आहे. दरम्यान, अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# उन्हाच्या वाढत्या झळांनी मुरूडकर बेहाल

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

घशाला कोरड, तीव्र चटके आणि उन्हाची काहिली वाढती असल्याने सकाळी ११ ते सायंकाळी ४ पर्यंत बाहेर पडणे अत्यंत कठीण झाले आहे. उन्हाच्या झळांनी मुरुडकर बेहाल झाले असून, तापमान ३५ वर गेले आहे. हवेतील आर्द्रता कमी होऊन शुष्क वारे वाहत असल्याने उन्हाच्या झळा आधिक बसत असल्याचे ज्येष्ठ मंडळींनी सांगितले. वाढलेल्या तापमानाने सतत तहान लागत असून, कोरड पडत आहे. यामुळे अनेकांना आजारपणाने घेरले असून, रुग्णाची संख्या वाढती दिसत आहे.

मुरूड समुद्रकिनारी असूनही समुद्रावरून गरम वारे वाहत आहेत. उन्हाची काहिली शमविण्यासाठी कोळीवाड्यातील मुले एकदरा, मुरूड आदी समुद्र खाडीच्या पाण्यात डुबक्या मारताना दिसून येत आहेत. तापलेल्या रस्त्यावरून चालणे अवघड झाले असून बाजारहाट करण्यासाठी आलेल्या महिलांनादेखील याची झळ पोहोचल्याचे दिसून आले. कडक उन्हामुळे ताज्या भाज्यादेखील वेगाने सुकत असल्याने त्यावर भाजी विक्रेत्या महिला पाणी शिंपडताना दिसत होत्या. सुट्ट्या पडल्यानंतर एप्रिल महिन्यात पर्यटक मुरूड, काशीद समुद्रात पोहण्याचा आनंद घेण्यासाठी त्याचबरोबर ताजी मासळी, हापूस आंबे, करवंद, ओले काजूगर आणि रानमेव्याचा आस्वाद घेण्यासाठी येत असतात; परंतु सध्या पर्यटकांचा शुकशुकाट असल्याने धक्कादायक चित्र असून, पर्यटन व्यवसाय थंडावला आहे.

### आंबा पिकाला धोका

**मुरुड मार्केट मध्ये पहिल्या मार्चच्या सत्रात ३० टक्के छोट्या आकारातील हापूस आंबे विक्रीस आले असले तरी अनेक ठिकाणी दुसऱ्या सत्रातील कैऱ्या अद्याप झाडांवरून दिसून येतात. रायवळ, पायरीसारख्या जातीचे आंबेदेखील मार्केटमध्ये दिसत नाहीत. सुरुवातीला ऑक्टोबर हिट, अवकाळी यामुळे या भागात उशिराने आंबा पीक येताना दिसत असले तरी उन्हाची तीव्रता वाढती राहिली तर येणाऱ्या आंब्याला धोका निश्चितच आहे, असे मत शेतकऱ्यांनी सोमवारी बोलताना व्यक्त केले. सध्या मार्केटमध्ये काही ठिकाणी तुरळक प्रमाणात ६००/- रुपये डझनाने आंबे विक्रीस आले आहेत. अजूनही पूर्ण वाढ न झालेले हिरवे आंबे झाडावर दिसून येतात.**

पान १ वरून

## आरसीएफची शाळा सुरु राहणार?

अधिकाऱ्यांसमवेत गुरुवारी बैठक झाली. शाळा सुरु ठेवा अशी मागणी पालकांनी केली. परंतु कंपनीच्या हातात काहीच नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्यामुळे आरसीएफची शाळा सुरु करण्याबाबत कंपनी प्रशासन काय भुमिका घेणार याकडे पालकांचे लक्ष लागून राहिले आहे.

आरसीएफ शाळेतून विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळते. त्यामुळे अनेक भागातील पालकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना आरसीएफच्या शाळेत दाखल करून घेतले आहे. मात्र, अचानक शाळा बंद होण्याच्या निर्णयामुळे चिंता निर्माण झाली आहे. पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कंपनीने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शाळा सुरु ठेवावी.

- श्री. वाघपंजे, पालक

## आमदारांचे पळपुटे धोरण?

गठीत करण्यात आल्या आहेत वेळोवेळी समितीच्या बैठका घेऊन आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्याच्या सुचनादेखील केल्या आहेत. मात्र अलिबागमधील वेश्वी ग्रामपंचायत हद्दीत विकासकामांचा भूमीपूजन सोहळा शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आला. निवडणूकीच्या कालावधीत भूमीपुजन करणे आचारसंहितेचा भंग असल्याचे गटविकास अधिकारी दाजी ताईंगडे यांनी स्पष्ट केले आहे. तरीदेखील वेश्वी येथील विकास कामांच्या भूमीपूजन सोहळ्याबाबत कारवाई करण्यास टाळाटाळ का करीत आहेत, असा प्रश्न जिल्ह्यातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा जागते रहो!

एका छोट्याशा तात्पुरत्या शेडखाली बसलेले खाकी वर्दीतील पोलीस कर्मचारी तसेच एक वाहतूक पोलीस आणि रात्री मोठ्या संख्येने खाकी वर्दीतील पोलीस कर्मचारी वाहनांची कसून तपासणी करीत असल्याचे दिसून येत आहे. कापडे बुद्रुक येथील पेट्रोल पंपासून काही अंतरावर हा तपासणी नाका उभारण्यात आला असून, संशयास्पदरित्या आढळल्यास संबंधित वाहनाची तपासणी वाहन थांबवून केली जात असल्याचे दिसून येत आहे. यावेळी वाहनचालकांकडून सहकार्य केले न गेल्यास कमी संख्येने असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून पोलादपूर पोलीस ठाण्याला कळविले जाऊन पोलादपूर पोलिसांकडून हे वाहन चोळई लेप्रसी मिशन पुलापर्यंत अडविण्यात येण्याची तत्परता दाखविण्यात येत आहे. रात्री साधारणपणे सर्वच वाहनांची तपासणी व चौकशी केली जात असून, रात्रंदिवसामध्ये साधारण ३२ ते ५० वाहनांची तपासणी व कागदपत्रांची खातरजमा केली जात आहे. ७ मे २०२४ पर्यंत या तपासणी नाक्यावर नाकाबंदी करून वाहनांची झाडाझडती घेण्यात येणार असून, वाहनांतून मद्यवाहतूक, अवैध शस्त्रवाहतूक, रोख रक्कम अथवा दंगल तसेच अनुचित घटना घडविण्यासाठी मानवी वाहतूक होत असल्यास संबंधित वाहने अडविण्यात येणार आहेत, अशी माहिती वाहतुक पोलीस धायगुडे आणि अन्य पोलीस कर्मचारी यांनी दिली.

## आजपासून सुरुवात, ७ मे रोजी मतदान

अधिकारी. तहसील कार्यालये, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील पंचायत समिती कार्यालय, नगरपालिका व नगर पंचायत कार्यालय, सर्व ग्रामपंचायती ठिकाणी लावण्यात येणार आहे.

निवडणूक पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी सक्षम ॲप, आपले उमेदवार ओळखा (क्नो युवर कँडडेट ॲप), सी-विजिलॲप, बोगस व्होटर ॲप यासह तंत्रज्ञानाचा वापर करून प्रणाली कार्यरत आहेत. पोस्टल मतदारांसाठी (इटीपिबियस) प्रणाली वापरताना प्रशासनाकडून यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहेत. या अनुषंगाने कारवाई करताना जिल्ह्यात १६९१ पैकी १४०९ शस्त्रे जमा झाली असून, राज्यात रायगड जिल्हा पाचव्या क्रमांकावर आहे. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने २१६ गुन्हे दाखल केले आहेत. भरारी पथके (फ्लाईंग स्काड) कार्यरत झाले आहेत. व्हिडिओ निरीक्षण पथक (व्हिडिओ सर्विलंस टीम-व्हीएसटी), खर्च निरीक्षण पथक (स्टाटिक सर्विलंस टीम-एसएसटी) अशी विविध पथकं स्थापन करण्यात आली आहेत. तसेच मतदान बुथ, वोटर हेल्पलाईन विविध ॲपची माहिती दिली. मतदान प्रक्रियेबाबत माहिती व दिव्यांग मतदारांना मतदानासाठी असलेल्या सेवासुविधांची माहिती यावेळी जिल्हाधिकारी जावळे यांनी दिली. याप्रसंगी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, खर्च पथक प्रमुख राहुल कदम, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे आदी उपस्थित होते.

## डॉ. विजय गवळी एलसीबीच्या जाळ्यात

गवळी व त्यांची पत्नी वर्षा गवळी यांच्या मालमत्तेची चौकशी सुरु होती. या चौकशीअंती १ कोटी ५२ लाख ४० हजार ५३० एवढी अपसंपदा संपादित केल्याचे आढळून आले असून, ही अपसंपदा त्यांच्या उत्पन्नापेक्षा ४४.५६ टक्के जास्त आहे. डॉ. विजय एकनाथ गवळी हे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी उपजिल्हा रुग्णालय पेण येथे कार्यरत होते, तर व त्यांची पत्नी वर्षा विजय गवळी या अधिपरिचारिका उपजिल्हा रुग्णालय पेण येथे कार्यरत होत्या. यामध्ये डॉ. विजय एकनाथ गवळी यांच्याविरुद्ध दिनांक १९ सप्टेंबर २०१८ रोजी पेण पोलीस ठाण्यात लाचेची रक्कम स्वीकारल्याबद्दल गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर लोकसेवक डॉ. गवळी व कुटुंबिय यांनी संपादित केलेल्या मालमत्तेची उघड चौकशी करण्यात आली. या चौकशीमध्ये आरोपी लोकसेवक डॉ. विजय गवळी यांचे व त्यांची पत्नी वर्षा गवळी यांची परीक्षण कालावधी दि. ०१ जानेवारी २००८ ते दि. १९ जानेवारी २०१८ पर्यंतचे एकूण उत्पन्न, खर्च व मालमत्ता यांची सविस्तर माहिती घेतली असता, त्यांनी परीक्षण कालावधी या शासकीय नोकरीचे कालावधीत आपल्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर करुन त्यांचे स्वतःचे व कुटुंबियांचे नावे १,५२,४०,५३०/- रुपयांची अपसंपदा एकूण उत्पन्नाच्या ४४.५६ टक्के संपादित केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन डॉ. विजय गवळी (५७) व त्यांची पत्नी वर्षा गवळी (५४) दोन्ही रा. वर्षा बंगला, शंकर नगर पेण, ता. पेण, जिल्हा रायगड यांच्याविरुद्ध फिर्यादी संतोष अरुण पाटील पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी गुन्हा दाखल करण्यात केला आहे. यातील आरोपी विजय गवळी यांना चौकशी कामी ताब्यात घेतले असून, त्यांच्या पत्नीलादेखील ताब्यात घेण्याची शक्यता आहे. या सर्व प्रकरणाचा सखोल तपास सुनील लोखंडे पोलीस अधीक्षक व महेश तरडे अप्पर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक शशिकांत पाडावे हे करीत आहेत.

## पशुधन वाऱ्यावर

त्याची आजतगायत दखल घेतली गेलेली नाही.

रिक्त पदे

पशु विकास अधिकारी - मंजूर ४ पदांपैकी ४ रिक्त
पशुधन पर्यवेक्षक - मंजूर ४ पैकी २ रिक्त
वर्णोपचारक - मंजूर १ पैकी १ रिक्त
परिचर - मंजूर ६ पदांपैकी ३ पदे रिक्त
एकूण रिक्त पदे = १०

पशुधन विकास अधिकारी नसल्याने पशुधन व पाळीव प्राण्यांवर योग्य प्रकारे उपचार होत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच पशुधन विभागातील योजना मिळण्यातदेखील अडचणी येतात. त्यामुळे लवकर पशुधन विकास अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करण्यात यावेत.

- शरद गोळे, शेतकरी, शिळोशी

## उमेदवारी अर्ज दाखल करताना सूचनांचे पालन करावे

दाखल करता येतील. दोनपेक्षा अधिक लोकसभा मतदारसंघात नाम निर्देशनपत्र दाखल करता येणार नाहीत. नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या उमेदवाराचे वय २५ वर्षापेक्षा कमी नसावे. ते पुढे म्हणाले की, नामनिर्देशनपत्र हे नमुना २अ मध्ये दाखल करावे, त्यासोबत नमुना २६ मधील प्रतिज्ञापत्र सादर करावे. नामनिर्देशनपत्राचा नमुना २अ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. नमुना २६ मधील प्रतिज्ञापत्र पूर्णपणे भरलेले असणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १७३ (अ) अन्वये उमेदवाराने स्वतः निवडणूक निर्णय अधिकारी किंवा प्राधिकृत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या समक्ष छाननीपूर्वी शपथ घ्यावी लागेल. नामनिर्देशनपत्र दाखल करता वेळी येणारी वाहने, व्यक्ती, मिरवणूक व इतर बाबी यावर होणारा खर्च उमेदवारांच्या निवडणूक खर्चात बंधनकारक राहील. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयीन परिसरात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याची उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दक्षता घ्यावी, असेही जावळे यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले, सर्वसाधारण उमेदवारांसाठी अनामत रक्कम २५ हजार रुपये व उमेदवार अनुसूचित जाती व जमातीच्या प्रवर्गातील असल्यास १२ हजार ५०० रुपये भरल्याची पावती किंवा चलनाची प्रत नामनिर्देशनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती व जमातीच्या प्रवर्गातील उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जात, जमात प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत सादर करावी.

# उरणमध्ये अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट

### गावांवर ओढविणार पुरांचे संकट



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील खाडी पात्रात, नैसर्गिक स्रोत असलेल्या भागात विकासकांनी दगड मातीच भराव टाकून बेकायदा बांधकामाला सुरुवात केली आहे. मात्र, प्रशासनाने या सर्व बाबींकडे स्वतःचे हित लक्षात घेऊन दुर्लक्ष केल्याने तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात यावर्षी पूर परिस्थिती निर्माण होणार आहे, अशी भीती स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

२६ जुलै २००५ साली उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. त्यात खाडीतील, नद्यांमधील पाणी ओव्हर फ्लो झाल्याने अनेक गावांमध्ये पुरावे पाणी शिरले होते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व सिडकोच्या अधिपत्याखाली येणारे अनेक रस्ते पाण्याखाली जाऊन जीवितहानी व वित्तहानी झाली होती. या घटनेचे गांभीर्य ओळखून संबंधित प्रशासनाने, स्थानिक ग्रामपंचायतीने खाडीतील, नदी, नाल्यावरील बेकायदा बांधकामे हटविण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्यानंतर संबंधित प्रशासनाने स्थानिक ग्रामपंचायतीने खाडीतील नदी नाल्यावरील बेकायदा बांधकामांकडे दुर्लक्ष केल्याने आज पुन्हा तालुक्यातील परिस्थिती जैसे थे आहे.

यावर्षी २६ जुलै २००५ ची पुनरावृत्ती खऱ्या अर्थाने टाळायची असेल तर स्थानिक ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग उरण, सिडको, उरण पंचायत समिती, तहसील कार्यालय उरण, जेएनपीए आणि उरण नगर परिषद यांनी उरण शहराबरोबर चिरनेर, विंधणे, दिघोडे, वेश्वी, चिर्ले, जासई, धुतूम, सोनारी, करळ, जसखार, नवघर, पागोटे, भेंडखळ, बोकडविरा, नागाव, चाणजे, केगाव, खोपटा, कोप्रोली, कळंबुसरे, मोठी जुई, सारडे, वशेणी, पिरकोण आदि ग्रामपंचायत हद्दीतील गावातील पाणलोट क्षेत्र, खाडी किनारा, नदी, नाल्यावरील बेकायदा सुरू असलेल्या दगड मातीच्या भरावाबरोबर अनधिकृत बांधकामांचा आढावा घेणे गरजेचे आहे. तसेच जनहित लक्षात घेऊन सदरच्या बेकायदा बांधकामांवर कारवाई करणे गरजेचे आहे, अशी मागणी पूरग्रस्त व स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## वाशिवली येथून तरूण बेपत्ता

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाशिवली येथे यमुना सोसायटी ए विंग रूम नं. ४०४ येथून घरात कोणालाही न सांगता महेश एकनाथ दळवी (२९, मूळ रा. टेंभरी, ता. खालापूर) हा कोठेतरी न सांगता निघून गेला आहे. याबाबत महेश एकनाथ दळवी यांच्या पत्नीने रसायनी पोलीस ठाण्यात मिसिंग तक्रार दाखल केली आहे.



## बहिरेश्वर जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रम



**। शिहू । वार्ताहर ।**

समस्त भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिहू गावचे ग्रामदैवत बहिरेश्वर जोगेश्वरी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिहू गावात वैकुंठवासी जनार्दन घरत यांच्या प्रेरनेणे व वैकुंठवासी बाळाराम म्हात्रे यांच्या कृपाशीर्वादाने दि.१२ ते १४ एप्रिलदरम्यान बहिरेश्वर जन्मोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन बहिरेश्वर ग्रामस्थ मंडळ व युवक मंडळ शिहू यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शुक्रवार दि १२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता श्रींचे मूर्तीला अभिषेक नेतृत्व तुकाराम महाराज बुर्डीकर, कलश पूजन, मूर्ती पूजन, ध्वजारोहन वसंत हाशा मोकल व अशा वसंत मोकल यांच्या हस्ते, दुपारी १ ते ५ बहिरेश्वर भजन मंडळ शिहू, श्रीराम भजन मंडळ जांभूळटेप, बापदेव महिला भजन मंडळ चोळे यांची भजनरुपी सेवा, संध्याकाळी ६ वाजता विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ जांबोशी यांचं हरिपाठ, रात्री ९ वाजता वाणी भूषण सोनालीताई फडके यांची कीर्तनरुपीसेवा होणार आहे. शनिवार १३ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता हरी एकनाम सप्ताहाची सुरवात होणार आहे. रविवार १४ एप्रिल रोजी १२.५ मिनिटांनी जन्मसोहळ्याची पुष्पवृष्ठी होईल,१ ते ४ तीर्थ प्रसाद व महाप्रसाद अन्नदाते नाझिमशेठ महम्मद हसन नालखांडे,तर रात्री ८ वाजता बहिरेश्वर जोगेश्वरी मातेच्या पालखीची मिरवणूक संपूर्ण गावात काढली जाणार असल्याचे ग्रामस्थ मंडळ व युवक मंडळ शिहू च्या वतीने सांगण्यात आले.

# महात्मा ज्योतिबा फुलेंची जयंती साजरी



**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे शहरातील भाजपाच्या विभागीय मंडळ कार्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि.११) सकाळी ११.३० वा. भाजपचे नेते पेण विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख प्रसाद भोईर यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, रोहा तालुका महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा अपर्णा सुटे, तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, शिक्षण सेलचे धनराज उमाले, ओबीसी सेलचे अंकुश सुटे, विवेक रावकर, पवन जगताप यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हा सामान्य रुग्णालयात मोफत प्लास्टिक सर्जरी शिबीर

**। खारेपाट । वार्ताहर ।**

जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग रायगड आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. नितीन मोकल (प्लास्टिक सर्जन) डॉ. स्वप्ना आठवले (प्लास्टिक सर्जन) यांच्या सहाकार्याने दि. ३ व ४ मे २०२४ सकाळी १० वाजतव जिल्हा सामान्य रुग्णालय, आलिबाग येथे मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये दुभंगलेले ओठ व टाळू, भाजलेले व्रण व जखमा, आकसलेले स्नायू, चेहऱ्यावरील गोंदवलेले व्रण, बाह्य शरीरावरील गाठी, जन्मत:च असलेले व्यंग किंवा अपघातातले अथवा भाजल्याने आलेले व्यंग आदींवर मोफत तपासणी व शस्त्रक्रिया करण्यात येईल. मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरजूंनी घ्यावा, असे आव्हान रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## उपसरपंचपदी अधिराज पाटील



**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील पागोटे ग्रामपंचायत येथे दि. १० एप्रिल रोजी अधिराज किशोर पाटील यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली आहे. सरपंच कुणाल पाटील यांनी उपसरपंचपदाचा कार्यभार अधिराज पाटील यांच्याकडे सोपवून त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे सर्वानुमते जाहीर करण्यात आले. पागोटे ग्रामपंचायत कार्यालयात बहुसंख्येने उपस्थित असलेले मान्यवर व ग्रामपंचायत सदस्य व महिला सदस्य यांनी यावेळी अधिराज पाटील यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव केला.

## निवडक

### पादचाऱ्याला कंटेनरची धडक

**पनवेल** : रस्ता पार करणाऱ्या पादचाऱ्याला कंटेनरने धडक दिली. या धडकेत रामराव आडे हे जखमी झाले. कंटेनर चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रामराव आडे हे पहाटे साडेतीनच्या समारास कोनगाव येथे विक्रेत्याला बॉयलर कोंबडी विक्रीबाबत विचारणा करण्यासाठी रस्ता पार करत होते. त्यावेळी भरधाव कंटेनरने रामराव आडे यांना धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात रामराव आडे जखमी झाले.

### पीव्हीसी पाईपने मारहाण

**पनवेल** : शिवीगाळ करून स्टीलच्या पाण्याची बाटली आणि पीव्हीसी पाईपने मारहाण केल्या प्रकरणी रमजान खान, जावेद शेख, आणि आलम खान यांच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बिलाल आणि त्याचा भाऊ राशीद हे मार्केटमधून इमारतीच्या लिफ्ट जवळ आले. यावेळी रमजान, आलम व जावेद हे बिलालचा भाऊ मोहम्मदला दमदाटी करत असल्याचे दिसून आले. याची विचारणा केली असता त्यांनी मारहाण केली.

### दुचाकीला लागली आग

**पनवेल** : पनवेल शहरात चालू स्थितीत असलेल्या दुचाकीला आग लागल्याची घटना घडली. या आगीमध्ये दुचाकीचे नुकसान झाले आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ दुचाकीला पेट्रोलच्या टाकीजवळ आग लागल्याने चालकाने ही गाडी सोडून दिली. यावेळी नागरिकांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर एका रिक्षामधून आग प्रतिरोधक बाटला घेऊन ही आग विझवण्यात आली. सुदैवाने यात कोणतेही जीवित हानी झाली नाही.

### पोलीस ठाण्यात बैठक

**पनवेल** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने आज पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत वपोनि अनिल पाटील यांनी मार्गदर्शन करताना मिरवणुका व इतर कार्यक्रम करताना कायदा व सुव्यवस्थेचा दृष्टीने मिरवणुका दिलेल्या मार्गाने विहित वेळेत शांततेत पार पाडावे. मिरवणुकीत महिला व पुरुष स्वतंत्र रांगा कराव्यात. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने व कायदा व सुव्यवस्थेचा दृष्टीने योग्य त्या सूचना केल्या.

### देशी दारूप्रकरणी कारवाई

**पनवेल** : देशी दारू आणि विस्कीच्या बाटल्या विनापरवाना विक्री केल्याप्रकरणी शालीक गावंड यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आर वन, करंजाडे येथे एक इसम विनापरवाना दारू विक्री करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी शालिक गावंड यांच्याकडे हजारो रुपये किमतीची देशी दारू आणि व्हिस्की सापडून आली.

## आली रे आली, आता आमची बारी आली; गुन्हेगारांकडून घेतले प्रतिज्ञापत्र

# गावगुंड पोलिसांच्या रडारवर

- ५८ जणांचा तडीपारीचा प्रस्ताव सादर
- २५७५ जणांचे प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रस्ताव

। रायगड । प्रतिनिधी ।

**जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी लोकसभा निवडणूक होत आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था टिकून राहावी यासाठी पोलिसांनी खबरदारी म्हणून गावगुंडांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. पोलिसांनी सक्रिय गुन्हेगारांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई सुरू केली आहे. गुन्हेगारी वर्तुळाच्या बळावर दहशत पसरविणाऱ्या गुंडाना चांगल्या वर्तणुकीची तंबी दिली जात आहे. अशा गुंडांकडून प्रतिज्ञापत्रावर चांगल्या वर्तनाची हमी लिहून घेतली जात आहे.**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ५८ आरोपींना तडीपार करण्याबाबतचे प्रस्ताव सादर केले आहेत. कलम १०७, १०९ आणि ११० नुसार एक हजार १२८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. दोन हजार ५७५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाईबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.

निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहिततेचे पालन व्हावे, कायदा व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सुरुवातीपासूनच सक्रिय गुन्हेगारांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे.

एकदा गुन्हेगाराला वर्तन सुधारण्याची संधी दिली जाते. पुन्हा त्याच्याकडून चांगल्या वर्तणुकीचे हमीपत्र घेतले जाते. यातील अटी-शर्तीचा भंग केल्यास कारवाई करण्यात येते. हद्दपारीचे प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडून मंजूर होताच थेट कारवाईचा बडगा उगारून आरोपींना जिल्ह्याबाहेर काढले जाणार आहे.



जिल्ह्यात हाभट्टीची दारू गाळणे, अवैध दारू विक्री, जुगार भरवणे, रेती तस्करी, जनावर तस्करी, गुटखा तस्कर अशा सराईत गुन्हेगारांवरही पोलिसांची करडी नजर आहे. या गुन्हेगारांकडून कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची खबरदारी घेतली जात आहे. अशा आरोपीच्या वर्तनात सुधारणा झाली नाही तर थेट हद्दपारीची कारवाई प्रस्तावित केली जात आहे.

सराईत गुन्हेगारांकडून भविष्यात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणार नाही, असे हमीपत्र आरोपीकडून भरून घेण्यात आले आहे. त्यासाठी पोलीस मुख्यालयात संपूर्ण जिल्ह्यातील सराईत यांना बोलावून त्यांना सूचना देण्यात येत आहे. प्रतिबंधात्मक कारवाईमध्ये१०७ नुसार एक हजार ३४ , १०९ नुसार २४, ११० नुसार २०, ९३ नुसार २७, ५५ नुसार ११, ५६ नुसार ९, ५७ नुसार ३ असा एकूण एक हजार १२८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. १०७ नुसार दोन हजार २४७, १०९ नुसार ८२, ११० नुसार १०२, ९३ नुसार १०६ , ५५ नुसार ५ , ५६ नुसार २८, ५७ नुसार २८ आणि १४४(३) नुसार ५ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. रायगड जिल्हा पोलिसांच्या हद्दीतील ११ आरोपी फरार आहेत. तर ६६३ वॉन्टेड आरोपींना पकडण्याची मोहीम पोलिसांनी सुरु केली आहे असे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

> **आचारसंहिता सुरु झाल्यानंतर आतापर्यंत रायगड पोलिसांनी दारूबंदीचे १७५, अवैध शास्त्र ३ , एनडीपीएस अंतर्गत १ गुन्हा दाखल करून नऊ लाख ६३ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. रायगड पोलिसांनी कार्यक्षेत्रातील ५८ आरोपींना तडीपार करण्याबाबतचे प्रस्ताव सादर केले आहेत. या प्रस्तावावर लवकरच निर्णय अपेक्षित आहे. कायदा हा सर्वांसाठी सारखा आहे. कुणीही त्याचे उल्लंघन करू नये. कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास कठोर कारवाई केली जाईल.**
>
> **– सोमनाथ घार्गे**
> **पोलीस अधीक्षक रायगड**

## पाली शहरातून पोलिसांचे रूट मार्च



। पाली । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुका, आगामी काळात साजरे होणारे सण, उत्सवांच्या काळात सुधागड तालुक्यात शहर आणि ग्रामीण भागात कोणतीही अनुचित घटना घडू नये, शांतता, सुव्यवस्था कायम रहावी. तसेच आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे, या उद्देशाने जिल्हा पोलिस अधीक्षक सौमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार व पोलिस उपअधीक्षक शैलेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक सरिता चव्हाण, यांच्या नेतृत्वाखाली पाली शहरातून पोलिसांचे पथसंचलन करण्यात आले.

संचलनात पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, नागोठणे सहाय्यक पोलिस निरीक्षक हरेश काळसेकर, पोलिस उपनिरीक्षक चौधरी, पोलिस उपनिरीक्षक गच्चे, यांच्यासह माणगाव येथील दंगल नियंत्रण पथक तसेच पाली, रोहा, कोलाड आणि नागोठणे येथील पोलीस पथकासह सुमारे ४५ महिला व पुरुष पोलीस अंमलदार या पथसंचलनात सहभागी झाले होते. सदर रूट मार्च हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, राम नवमी, महावीर जयंती, हनुमान जयंती हे सण उत्सव शांततेत पार पाडण्याच्या अनुषंगाने घेण्यात आले.

## दंतचिकित्सा शिबीर

। रसायनी । वार्ताहर ।

चौक येथील व्यसनमुक्ती केंद्र आई बाबा फाउंडेशन व डॉ. जी डी पोळ फाउंडेशन वाय एम टी डेंटल कॉलेज खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने दंत चिकित्सा व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. व्यसनमुक्ती केंद्रातील उपचार घेण्यासाठी आलेल्या २५० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

सदर शिबिरासाठी दंतचिकित्सक डॉ.वैभव कुमार, डॉ.मंजिरी देशमुख, डॉ.रेणू तायवडे तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रविण नवरे, प्रसाद ओक आदी संस्था व्यवस्थापन उपस्थित होते.या प्रसंगी डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत दंत समस्येवर निराकरण कसे करावे याबद्दल मार्गदर्शनदेखील केले.

## मोफत नेत्र शिबिरात २३ रुग्णांवर शस्त्रक्रिया

। माणगाव । वार्ताहर ।

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार दि. १० एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या माणगाव येथील सभागृहात मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ६५ रुग्णांची तपासणी करून २३ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

माणगावात गेली दोन वर्षांपासून शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरात आतापर्यंत २००० हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजय मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात. नेत्ररोग शिबिराला दर महिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ जनता घेत आहे. दक्षिण रायगडातील माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, पोलादपूर, रोहा आदी तालुक्यातील जवळपास गेल्या दोन वर्षांपासून शिबिरात २००० हुन अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली असून गोरगरीब जनतेला दृष्टी मिळाल्याचा आनंद हा सुखावणारा आहे. आजची महागाई पाहता गरिबांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून घेणे सोपे काम राहिलेले नाही. सामाजिक बांधिलकीतून आपण हे समाजकार्य करीत आहोत. जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही आपण हे शिबीर राबविणार असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले. सदर शिबीर आयोजित करण्यासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे विजयशेठ मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा यांनी विशेष आभार व्यक्त केले.

## दुचाकी चोरणारे त्रिकुट गजाआड

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल, कामोठे व नवी मुंबई परिसरातील दुचाकींची चोरी करून, त्या खुल्या मार्केटमध्ये कमी भावात विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात खांदेश्वर पोलिसांना यश आले आहे. पकडलेल्या तीन आरोपींकडून खांदेश्वर पोलिसांच्या पथकांनी लाखो रुपयांच्या ११ दुचाकी जप्त केल्या आहेत. या दुचाकींमध्ये ५ बुलेटचादेखील समावेश आहे.

जगदीश माळी , प्रवीण सीरवी, अरविंदकुमार हिरागर असे पकडलेल्या तीन संशयीत आरोपींची नावे आहेत. या तीन संशयितांपैकी कामोठे वसाहतीमध्ये राहणारा अरविंदकुमार हिरागर हा पनवेल तसेच नवी मुबई परिसरात डिलिव्हरी बॉय म्हणून काम करायचा. तसेच विचुबे येथील प्रवीण सिरवी हा



देखील खासगी सप्लायर म्हणून काम करायचा. हे काम करताना, सोसायटीच्या आवारात तसेच रेल्वे स्टेशन च्या आवारात पार्क करून ठेवलेल्या गाड्यांवर लक्ष ठेवून असायचे. रात्री याच दुचाकी चोरून पोबारा करायचे. या चोरांना पकडणे नवी मुंबई पोलिसांसाठी आव्हान झाले होते. या दुचाकी चोरी बाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर, पालिसांनी गुन्ह्याच्या तपासाला सुरवात केली. पोलिसांच्या पथकांनी या दोन संशयीतांना नवीन पनवेल मधील शिवा कॉम्प्लेक्स येथून अटक केली. तिसऱ्या संशयीताला पुणे येथून अटक केली. त्यांची अधिक चौकशी केली असता, या चोरांनी या सर्व गाड्या पुणे, राजस्थान तसेच नवी मुंबई परिसरात विकल्या असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अवघ्या काही दिवसांतच जवळपास ११ दुचाकी राजस्थान, पुणे आणि नवी मुंबई येथे जाऊन ताब्यात घेऊन जप्त केल्या आहेत.

## कोलाड रेल्वे स्टेशनचे वरसगांव रेल्वे स्टेशन नामकरण करावे

। कोलाड । विश्वास निकम ।

तालुक्यातील कोकण रेल्वेवर असणाऱ्या कोलाड रेल्वे स्टेशनला वरसगांव रेल्वे स्टेशन असे नाव देण्यात यावे, तसेच या कोकण रेल्वे मार्गांवर विर ते पनवेल लोकल रेल्वे सुरु करावी अशी मागणी वरसगांव ग्रामस्थांकडून केली जात आहे.

कोकण रेल्वे वरील वरसगांव हद्दीत असणाऱ्या रेल्वे स्टेशनला कोलाड रेल्वे स्टेशन असे नाव देण्यात आले आहे. परंतु रेल्वे स्टेशन पूर्णपणे वरसगांव हद्दीत असून या रेल्वे स्टेशनच्या परिसरातील ८० एकर जमीन ही वरसगांव येथील शेतकऱ्यांची कोकण रेल्वेसाठी संपादित करण्यात आली आहे. या




वरसगांव ग्रामस्थांची मागणी

हद्दीत कोलाडचा कोणताही संबंध नसून या परिसरातील सर्व भाग वरसगांव हद्दीत मोडत असल्यामुळे या परिसरातील कोलाड रेल्वे स्टेशनचे वरसगांव रेल्वे स्टेशन असे नामकरण करावे अशी मागणी वरसगांव ग्रामस्थांकडून केली जात आहे.

कोकण रेल्वेमुळे रायगडमधील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी कवडी मोल भावाने संपादीत करण्यात आल्या. नंतर कोकण रेल्वे सुरु करण्यात आली. रोहा ते दिवा लोकल रेल्वे सुरु करण्यात आली. परंतु याचा फायदा फक्त रोहापर्यंत लोकांना झाला आहे कोलाड, इंदापूर, माणगाव, महाड तसेच श्रीवर्धन, म्हसळा या परिसरातील लोकांना याचा फायदा अद्याप ही झालेला नाही. कारण या मार्गावरुन जाणारी रत्नागिरी पॅन्सेंजर ही एकमेव रेल्वे दिवसातून एक वेळा थांबते. याशिवाय अद्याप या मार्गावर कोणतीही लोकल रेल्वे सुरु केली नाही. त्यामुळे या परिसरातील लोकांना याचा फायदा काय? अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांची आहे.

## तृषाली जाधव यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार

। आंबेत । वार्ताहर ।

सामाजिक कार्यात आपली वेगळी छाप उमटविणाऱ्या आणि तळागाळातील महिलांसोबतच इतर सामाजिक कार्यात विशेष तत्पर असणाऱ्या शांतीदूत परिवार संस्थेच्या राष्ट्रीय अध्यक्षा तृषाली जाधव यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार महा एनजीओ फेडरेशनतर्फे नुकताच देण्यात आला. डॉ. विठ्ठल जाधव मार्गदर्शक शांतिदूत परिवार यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी शेखर मुंदडा, मुकुंद शिंदे, राहुल जगताप उपस्थित होते. मागील वर्षी देखील महा एनजीओ फेडरेशनतर्फे पुरस्कार जाहीर झाला होता. माझ्या सामाजिक कार्याची दखल घेऊन कौतुकाची थाप देत मला हा पुरस्कार दिल्याने आनंद आहे. असे तृषाली जाधव म्हणाल्या.

## डॉ.आंबेडकर जयंती शांततेत साजरी करा

### उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांचे आवाहन

। खोपोली । प्रतिनिधी ।

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती खोपोली शहरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते अशी ओळख रायगड जिल्ह्यात आहे. यंदाही जयंती शांततेत आणि उत्साहात साजरी करा. शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने खोपोली शहर पोलीस ठाण्यात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत होणारे कार्यक्रम व निघणाऱ्या मिरवणूकींबाबत उपस्थितांना शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीला पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे, पोलीस उपनिरीक्षक कर्मराज गावडे, अभिजीत व्हरंबले, अलोक किस्मतराव, सुधाकर लहाने, नगरपालिकेचे अधिकारी गजानन जाधव, माजी नगरसेवक किशोर पानसरे, कैलास गायकवाड, विकी गायकवाड, विशाल गायकवाड, त्याचप्रमाणे खोपोली शहरातील विविध भागातील विविध मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्याने कार्यकर्त्यांनी नियमाचे पालन करीत वेळेत कार्यक्रम करावे. त्याचप्रमाणे मिरवणूक ही वेळेत काढण्यात यावी, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी करीत मिरवणुकीदरम्यान गालबोट लागू नये, यासाठी काळजी घ्यावी. यासाठी स्वयंसेवक नेमणूक करण्यात यावी. त्यांना ओळखपत्र देण्यात याव. विशेषतः मिरवणुकीत महिलांच्या सुरक्षितेची जबाबदारी आयोजकांनी घ्यावी, कुठलाही अनुचित प्रकार होणार नाही याची पण काळजी घ्यावी. तुमच्यासोबत आम चे अधिकारी वर्ग कर्मचारी असणार आहेतच तसेच सोशल मीडियावर आलेल्या चुकीचे मेसेज ताबडतोब डिलीट करावे. याबाबतची माहिती आम्हाला द्यावी, अशीही सूचना कदम यांनी केली.

उपस्थित मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून कार्यक्रम नियोजनाबाबतची माहिती दिली. मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या वतीने माजी नगरसेवक किशोर पानसरे, कैलास गायकवाड, विकी गायकवाड यांनी मिरवणूक शांततेत होणार असल्याचे सांगितले.

बैठकीचे नियोजन पोलीस नाईक सतीश बांगर, पोलीस अमलदार प्रदीप खरात केले होते. उपस्थितांचे आभार पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत यांनी मानले.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी ‘झेडपी पॅटर्न’

### वशिलेबाजीला चाप, ऑनलाईन बदल्यांमुळे मिळणार पुरेसे मनुष्यबळ

। रायगड । प्रतिनिधी ।

एसटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या करताना अनेक कर्मचारी वशिलेबाजी करून हवी त्या ठिकाणी बदली करून घेतात. त्यामुळे काही विभागात जास्त, तर काही ठिकाणी कमी कर्मचारी, अशी परिस्थिती आहे; मात्र आता वशिलेबाजीला चाप बसणार आहे. कारण येत्या जूनपासून एसटी महामंडळाच्या ऑनलाईन बदल्या होणार असून त्यासाठी जिल्हा परिषद पॅटर्न राबविला जाणार आहे. एसटी महामंडळाचे ९० हजारहून अधिक कर्मचारी - अधिकारी आहेत. काही विभागात कर्मचाऱ्यांना काम नाही, तर दुसरीकडे मुंबई, पालघरमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे काही कर्मचाऱ्यांना दोन शिफ्टमध्ये काम करावे लागते. २०२१ मध्ये राजकीय हस्तक्षेपाने मोठ्या प्रमाणात बदल्या करण्यात आल्यामुळे अनेक विभागात तफावत झाली आहे.

पर्यवेक्षक कर्मचारी अधिकारी यांची तीन वर्षांत बदली व्हावी, असे परिपत्रक आहे; मात्र काही जणांना १५ वर्षे बदली मिळत नव्हती. चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करताना सेवाज्येष्ठता आणि बदली विनंती अर्ज ज्येष्ठता तपासून बदली करणे आवश्यक आहे; मात्र तसे होत नाही. पती-पत्नी एकत्रीकरण, दिव्यांग, वैद्यकीय बदल्या व्यवस्थित होत नव्हत्या; मात्र आता या सगळ्यांना न्याय मिळणार आहे.

एखाद्या एसटी कर्मचाऱ्याला बदली हवी असेल, तो त्या आगारात किंवा संबंधित कार्यालयात अर्ज करतो. त्यानंतर तो अर्ज विभागीय कार्यालयात पाठविला जातो. विभागीय कार्यालयाकडून अर्ज मध्यवर्ती कार्यालयाकडे येतो. त्यानंतर कर्मचाऱ्याची बदली केली जाते; मात्र अनेकदा काही आमदार किंवा मंत्री यांचे पत्र घेऊन दबाव आणतात. त्यामुळे गरजू कर्मचाऱ्यांवर अन्याय होतो. जिल्हा परिषदमध्ये कर्मचाऱ्यांच्या बदल्या ऑनलाईन पद्धतीने केल्या जात आहेत. एका विभागातील खात्यात आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आकडा लॉक केला जातो. आवश्यक तितक्याच कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतात. एसटी महामंडळाचा ऑनलाईन बदल्या करण्याचा अतिशय चांगला निर्णय आहे. त्यामुळे गरजू कर्मचाऱ्यांना न्याय मिळेल. असे एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस, श्रीरंग बरगे यांनी सांगितले.



> **जिल्हा परिषदेच्या धर्तीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहेत. येत्या १५ दिवसात कामाची निविदा निघणार असून येत्या जूनपासून कर्मचाऱ्यांच्या ऑनलाईन बदल्या होतील.**
>
> **-डॉ. माधव कुसेकर, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, एसटी महामंडळ**

## काशिनाथ जाधव यांची निवड

। पनवेल । वाताईर ।

पनवेल जेष्ठ नागरिक संघाच्या अंतर्गत हिशोब तपासणीस पदी संस्थेचे कार्य कुशल आणि अभ्यासू सभासद काशिनाथ लक्ष्मण जाधव यांची एकमताने निवड झाली आहे. शासकीय सेवेत असताना त्यांनी प्रदीर्घकाळ विविध सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण केले. उच्च पदावरून मंत्रालयातून सेवानिवृत्त झाल्यापासून आज तागायत पनवेल येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय, जनजागृती ग्राहक मंच, निवृत्ती सेवक मंडळ, मराठा महासंघ अशा विविध सामाजिक संस्थांचे ते पदाधिकारी आहेत. आर्थिक सल्लागार म्हणून त्यांची कारकीर्द देदिप्यमान आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील धामणसई पंचक्रोशी तर्फे सोनगाव येथे १३ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोनगाव येथे संपन्न होणाऱ्या सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ९ ते १२ व दु.२ ते ४ ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, सायं.४ ते ५ प्रवचन,५.३० ते ७ हरिपाठ, ७ ते ९ हरिकिर्तन व महाप्रसाद तद्नंतर जागर, भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

या सप्ताहात १३ एप्रिल रोजी ह.भ.प.नारायणमहाराजवाजेपंढरपूर, १४ एप्रिल रोजी ह.भ.प.नित्यानंद महाराज मांडवकर चणेरा, १५ एप्रिल रोजी ह.भ.प.संजय महाराज वेळूकर सातारा, १६ एप्रिल रोजी ह.भ.प.निवृत्ती महाराज पाटील पनवेल, १७ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ श्रीराम जन्मानिमित्त ह.भ.प.महादेव महाराज सानप गावठाण, रात्रौ.ह.भ.प.गुरूवर्य पुरूषोत्तम महाराज पाटील धाटाव, १८ एप्रिल ह.भ.प.श्रवण महाराज अहिरे नाशिक, १९ एप्रिल ज्ञानेश्वर महाराज पारधी डोंबिवली, २० एप्रिल स.१० ते १२ ह.भ.प.दिनेश महाराज कडवट वांदोली यांचे कल्याचे किर्तन आदी संपन्न होणार आहेत.

# पुतणे केविलवाणे

राज्यात अनेक वर्षे दोन पुतण्यांची फार चर्चा असते. पण लोकसभा निवडणुकीत या दोघांचीही अवस्था केविलवाणी झाली आहे. यातले एक म्हणजे अजित पवार. हे कायम सत्तेच्या वळचणीला राहतात. सत्ता नसेल तर त्यांचा जीव कासावीस होतो. पण सत्तेत असल्यावर हे एकदम अरेराव असतात. निवडणुकीत निवडून येण्यासाठी अनेक भानगडी कराव्या लागतात व त्या आपण केल्या आहेत अशी कबुली त्यांनी अनेक वर्षांपूर्वी सांगलीमध्ये दिली होती. होय, मी आहेच टग्या असे ते म्हणाले होते. पण यंदा मोदींच्या भाजपपुढे त्यांची सगळी टगेगिरी म्यान झालेली दिसते. आधी यांची इच्छा होती की शिंदे गटाइतक्याच जागा आपणही लढू. पण नंतर केवळ तीन-चार जागा कशाबशा हाताला लागल्या. त्या देतानाही भाजपवाल्यांनी वाटाघाटींमध्ये इतका घामटा काढला की, दिल्लीत चर्चेला जाणेच दादांनी बंद करून टाकले. धाराशिवची जागा मिळाली पण उमेदवारच नव्हता. भाजप आमदाराची पत्नी असलेल्या अर्चना पाटलांना आयात करावे लागले. आता त्या म्हणतात की मी राष्ट्रवादी काँग्रेस कशाला वाढवू? साताऱ्यात उदयनराजे यांचे घड्याळ बांधायला तयार नाहीत. रायगडमध्ये शिंदे गट व भाजपवाले परफेक्ट कार्यक्रम करायला टपलेले आहेत. तिकडे शिरुरमध्ये ज्या शिवाजीराव आढळराव पाटलांना पाडण्यासाठी पूर्वी जिवाचे रान केले त्यांनाच उमेदवारी द्यावी लागली. मावळमध्ये ज्या श्रीरंग बारणे यांनी मुलगा पार्थ पवारांना पाडले त्यांच्या प्रचारासाठी आता फिरावे लागणार आहे. आणि बारामतीमध्ये तर सर्वस्व पणाला लागले आहे. तिथे हार झाली तर पार्थपाठोपाठ पत्नीलाही ते निवडून आणू शकले नाहीत असा ठपका माथी बसणार आहे. विजय मिळवण्यासाठी वाटेल ते बोलावे लागत आहे. शरद पवार हे आपल्या प्रचाराच्या जोरावरच निवडून येत होते, असे विधान त्यांनी परवा केले. मुख्यमंत्री होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या या नेत्याला भाजपवाल्यांनी पुणे जिल्ह्याच्या परिसरातला चार चांदांचा सुभेदार बनवून टाकले आहे.

## हाती तुणतुणे आले

दुसरे पुतणे म्हणजे राज ठाकरे. यांचा भ्रम असा की, आपण स्वतःच एक सत्ताकेंद्र आहोत. काकांप्रमाणे आपणही रिमोट कंट्रोल खेळवत आहोत अशी त्यांची समजूत आहे. पण यांचे काका स्वतःच्या बळावर पन्नास-साठ आमदार आणि दहा-पंधरा खासदार निवडून आणू शकत होते. राज यांचा कसाबसा एक आमदार गेल्या वेळी निवडून आला. मुंबई महापालिकेत दाणादाण झाली. नाशिक बघता बघता हातातून गेले. एक खरे की, प्रसिध्दीच्या झोतात राहण्याचे तंत्र यांना चांगले साधले आहे. परवाच्या गुढीपाडव्याच्या सभेचीही नेहमीप्रमाणे हवा झाली होती. गावात तमाशा येणार असला की सकाळपासून एक रिक्षा लाऊडस्पीकर लावून ओरडत फिरते. राज यांच्या कोणत्याही सभेच्या दिवशी वृत्तवाहिन्यांकडे ही रिक्षावाल्याची भूमिका असते. पण यंदा राज यांचे वगनाट्य साफ पडले. त्यांनी नरेंद्र मोदी निवडून यावेत म्हणून महायुतीला बिनशर्त पाठिंबा देऊन टाकला. राज यांनी किमान चौथ्यांदा आपली भूमिका बदलली. २०१९ मध्ये हेच राज ठाकरे लाव रे तो व्हिडिओ असे म्हणून मोदींच्या विरोधात प्रचार करत होते. तेव्हा पुलवामामधील हल्ला आणि नंतरचा सर्जिकल स्ट्राईक हा मोदींचा निवडणूक स्टंट होता असा थेट आरोप ठाकरे करीत होते. पुलवामाचा चौकशी अहवाल बाहेर आलेला नाही. गेल्या पाच वर्षांमध्ये मोदींच्या राजवटीने हुकुमशाहीचा कळस गाठला आहे. ज्या ब्रिजभूषण सिंगने राज ठाकरे यांना अयोध्येत पाऊल टाकू देणार नाही असे सांगितले त्याला भाजपने पुरेपूर संरक्षण दिले आहे. महिला कुस्तीपटूंनी अत्याचाराविरोधात आंदोलन करूनही सिंग याची पोलिस चौकशी झाली नाही. उलट कुस्तीगीर संघटनेवर पुन्हा त्याचेच वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. मोदी व शाह यांनी फोडाफोडी करून महाराष्ट्राच्या राजकारणाची पुरती वाट लावून टाकली आहे. मात्र याकडे डोळेझाक करून मोदी यांच्या नेतृत्वाची कशी देशाला गरज आहे याचे पवाडे गाण्याची वेळ नवनिर्माणकर्त्यांवर आली आहे.

## इडीच्या भीतीने...

मुंबईतील कोहिनूर गिरणी खरेदी प्रकरणात काही काळापूर्वी राज ठाकरे यांची इडी चौकशी झाली होती. त्यानंतर ठाकरे यांची राजकीय भूमिका बदलली आहे. एरवी खळ्ळ खटॅकची भाषा करणाऱ्या या नेत्याची इडी चौकशी किंवा संभाव्य तुरुंगवासाच्या भीतीने बहुदा बोबडी वळली आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्या भाजप नेत्यांसोबतच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. शिवाय, त्यांनी सरकारला पत्रे लिहावीत आणि लगेच सरकारने त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात असे तथाकथित योगायोग घडू लागले होते. अर्थात, सरकारनेही त्यांना दाखवायची तिथे जागा दाखवलीच. मध्यंतरी मुंबई-गोवा महामार्गाचे काम होत नसल्याबद्दल त्यांनी पनवेलला येऊन आंदोलनाचा एक स्टंट केला. मात्र त्याला आपण किंमत देत नसल्याचे सरकारने दाखवून दिले. मनसेने मग तो विषय सोडून दिला. आतादेखील राज यांनी भाजपच्या पाशवी ताकदीपुढे शरणागती पत्करली आहे. अर्थात ते करताना आव मात्र असा आहे की ते भाजपवर जणू मेहरबानी करीत आहेत. बिनशर्त पाठिंबा ही त्यासाठीचीच टूम आहे. मांजर डोळे मिटून दूध प्यायले म्हणून लबाडी लपत नाही. कार्यकर्ते व मतदार हे मूर्ख नसतात हे राज यांनी लक्षात ठेवायला हवे. अर्थात, मनसे हा कधीही एक पक्ष म्हणून उभा राहिलेला नाही. राज यांनी मनाला येईल तेव्हा पुणे, नाशिक किंवा कोकणाचे दौरे करावेत. भाषणे ठोकावीत आणि गायब व्हावे असे गेली पंधरा वर्षे सातत्याने घडले आहे. पक्ष म्हणून कोणताही ठोस कार्यक्रम नाही. विविध प्रश्नांवर भूमिका नाही. याचमुळे आज एखाद्या किरायाच्या टेम्पोप्रमाणे भाजपवाले त्याचा वापर करून घेणार आहेत. उद्धव यांच्या शिवसेनेवर टीका करणारे भाडोत्री टीकाकार इतकाच त्यांचा उपयोग आहे. राज आता विधानसभेच्या तयारीच्या गोष्टी करीत आहेत. पण महायुतीतल्या आतल्या पुतण्याची डाळ शिजेना तिथे या बाहेरच्या पुतण्याला कोण विचारणार आहे? खरोखर, या दोन पुतण्यांची भाजपने काय ही केविलवाणी अवस्था केली आहे!!

विचार

# शाकाहार महागला, सोने-घरे वधारली

**जागतिक बँकेने अलिकडेच भारताच्या विकासदराचा ताजा अंदाज पुढे आणला. यामुळे अर्थक्षेत्राचे नवे चित्र समोर आले. दरम्यान, देशात शाकाहारी भोजन महागले असून मांसाहारी जेवण स्वस्त झाले, हे सांगणारी एक पाहणी समोर आली. याच सुमारास लक्झरियस घराच्या मागणीत वाढ होत असून त्या तुलनेमध्ये परवडणारी घरे कमी प्रमाणात विकली गेल्याचे दिसून आले तसेच सोन्याला चांगलीच झळाळी आल्याचेही स्पष्ट झाले.**

सरत्या आठवड्यामध्ये जागतिक बँकेने भारताच्या विकासदराचा ताजा अंदाज पुढे आणला. यामुळे अर्थक्षेत्राचे नवे चित्र समोर आले. दरम्यान, देशात शाकाहारी भोजन महागले असून मांसाहारी जेवण स्वस्त झाले, हे सांगणारी एक पाहणी समोर आली. याच सुमारास लक्झरियस घराच्या मागणीत वाढ होत असून त्या तुलनेमध्ये परवडणारी घरे कमी प्रमाणात विकली गेल्याचे दिसून आले तसेच सोन्याला चांगलीच झळाळी आल्याचेही स्पष्ट झाले.

जागतिक बँकेने अलिकडेच २०२४ साठी भारताच्या आर्थिक वाढीचा (जीडीपी वाढ) अंदाज १.२ टक्क्यांनी वाढवून ७.५ टक्के केला आहे. जागतिक बँकेच्या मते सेवा आणि औद्योगिक क्षेत्रातील तेजीमुळे भारताची उत्पादन वाढ २०२४ या आर्थिक वर्षात ७.५ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. या काळात उत्पादन वाढ आणि एकत्रीकरणामुळे वित्तीय तूट आणि सरकारवरील कर्ज कमी होईल. अहवालानुसार, २०२३ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये (ऑक्टोबर-डिसेंबर) आर्थिक व्यवहारांची वाढ ८.३ टक्के होती. गुंतवणूक आणि सरकारी उपभोगात सातत्याने होणारी वाढ यामुळे हे घडत आहे. अलीकडील सर्वेक्षण डेटामधील मजबूत कामगिरी पुढे चालू राहण्याची शक्यता आहे.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार, २०२३ च्या मध्यापासून महागाई रिझर्व्ह बँकेच्या दोन ते सहा टक्क्यांच्या लक्ष्य श्रेणीत राहिली आहे. तथापि, अन्नधान्याची महागाई वाढली आहे. 'एल निनो'मुळे कमी होणारे पिकांचे उत्पादन हे त्यामागील एक महत्वाचे कारण आहे. जानेवारीच्या सुरुवातीला जागतिक बँकेने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पादनवाढीचा अंदाज ६.४ टक्के राखला होता. बँकेने आपल्या सहामाही 'ग्लोबल इकॉनॉमिक रिपोर्ट'मध्ये हा अंदाज जाहीर केला आहे. जागतिक बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा अंदाज ६.५ टक्के ठेवला आहे. जागतिक बँकेने असेही म्हटले आहे की जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा विकास वेगाने होईल.



जागतिक बँकेचा हा अंदाज प्रामुख्याने देशांतर्गत मागणीतील मजबूत वाढ, सार्वजनिक पायाभूत सुविधांवरील खर्च आणि खाजगी क्षेत्रातील पतवाढीमुळे प्रभावित आहे. 'फिच' या जागतिक रेटिंग एजन्सीने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवरून सात टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. मजबूत देशांतर्गत मागणी आणि वाढीव

**महेश देशपांडे**

गुंतवणुकीमुळे भारताच्या आर्थिक विकासाला पाठिंबा मिळेल, असे 'फिच'ने म्हटले आहे. रेटिंग एजन्सीने २०२४ च्या अखेरीस किरकोळ महागाई दर चार टक्क्यांपर्यंत घसरण्याचा अंदाज वर्तवला आहे. रिझर्व्ह बँक जुलै ते डिसेंबर दरम्यान रेपो दरात ०.५ टक्के कपात करेल अशी 'फिच'ची अपेक्षा आहे. 'नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिस' (एनएसओ) च्या अधिकृत डेटाने ऑक्टोबर-डिसेंबर या कालावधीत देशाचा जीडीपी ८.४ टक्क्यांनी वाढल्याचे दर्शवल्यानंतर 'फिच'च्या अंदाजातील हा बदल जवळजवळ दोन आठवड्यांनंतर आला आहे. उत्पादन आणि खाण क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीमुळे हे वाढले आहे. गेल्या काही दिवसांमध्ये कांदा, टोमॅटो, बटाटा यासारख्या फळभाज्यांच्या किंमतीमध्ये झालेल्या बदलामुळे शाहाकारी जेवण महागले आहे. याबाबत 'क्रिसिल मार्केट इंटेलिजेंस अँड ॲनॅलिटिक्स' या संस्थेने 'रोटी राईस रेट इंडेक्स' नावाने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार शाहाकारी जेवणाची थाळी गेल्या वर्षाच्या तुलनेत सात टक्क्यांनी महागली आहे. दुसरीकडे मांसाहारी जेवणाच्या थाळीच्या किमतीत मात्र घट झाली आहे. मार्च २०२३ मध्ये शाहाकारी जेवणाच्या थाळीची किंमत सुमारे २५.५ रुपये होती. आता हीच किंमत मार्च २०२४ मध्ये २७.३ टक्क्यांपर्यंत महागली आहे. व्हेज थाळीमध्ये साधारणपणे भाकरी, भाजी, भात, डाळ, दही, सॅलेड अशा प्रकारचे अन्नपदार्थ असतात. गेल्या काही दिवसांमध्ये फळभाज्या महागल्या आहेत. त्यामुळे गेल्या वर्षाच्या तुलनेत शाहाकारी जेवणाची थाळी महागल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, नॉन व्हेज थाळीची किंमत मात्र सात टक्क्यांनी कमी झाली आहे. कोंबड्यांची मागणी घटल्यामुळे सध्या ही किंमत कमी आहे, असे 'क्रिसिल'चे म्हणणे आहे. नॉन व्हेज थाळीची किंमत मार्च २०२३ मध्ये ५९.२ रुपये होती. मार्च २०२४ मध्ये ती ५४.९ रुपयांपर्यंत कमी झाली. फेब्रुवारी महिन्यात या नॉन व्हेज थाळीची किंमत ५४ रुपये होती.

कांदा आणि बटाट्याच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्यामुळे सध्या व्हेज थाळी महागली आहे. 'क्रिसिल' संस्थेच्या म्हणण्यानुसार कांद्याचा दर ४०, टोमॅटोचा दर ३६ तर बटाट्याचा दर साधारण २२ टक्क्यांनी वधारला असल्यामुळे शाहाकारी थाळी महागली आहे. पुरेशा प्रमाणात पुरवठा नसल्यामुळे तांदूळ १४ तर डाळीचा दर २२ टक्क्यांनी वाढला आहे. दुसरीकडे, ब्रॉयलर कोंबडीच्या मांसाचा दर १६ टक्क्यांनी कमी झाला आहे. त्यामुळेच नॉन व्हेज थाळीच्या दरात घट झाली आहे. मार्च हा रमजानचा पवित्र महिना होता. या महिन्यात मात्र ब्रॉयरल कोंबडीच्या मांसात पाच टक्क्यांनी वाढ झाली होती. याच सुमारास घरांच्या किंमतीत वाढ होत असल्याचे दिसून आले. यासंदर्भातील एका अहवालातील माहितीनुसार जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ या तिमाहीमध्ये घरांच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे जास्त किंमतीच्या घरांच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. एक कोटींपेक्षा जास्त किंमतीच्या घरांच्या विक्रीत ५१ टक्क्यांची वाढ झाली तर ५० लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या घरांच्या विक्रीत घट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. 'नाइट फ्रँक'च्या अहवालानुसार पहिल्या तिमाहीमध्ये घरांच्या विक्रीत नऊ टक्क्यांची वाढ झाली. जानेवारी ते मार्चदरम्यान ८६,३४५ घरांची विक्री झाली. ही विक्री गेल्या सहा वर्षांमधील कोणत्याही तिमाहीतील दुसऱ्या क्रमांकाची विक्री आहे. याआधी ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ या तिमाहीमध्ये घरांची सर्वाधिक विक्री झाली होती. अहवालात दिलेल्या माहितीनुसार, मोठ्या आठ शहरांमध्येच ८६ हजार ३४५ घरांची विक्री झाली आहे. त्यापैकी २३,७४३ घरांची विक्री एकट्या मुंबईत झाली. ही विक्री मागील वर्षीच्या तुलनेत १७ टक्क्यांनी जास्त आहे. म्हणजे गृहविक्रीच्या बाबतीत मुंबई शहर सर्व शहरांपेक्षा आघाडीवर आहे.

दरम्यान, आठ शहरांमध्ये विक्री झालेल्या ८६,३४५ घरांपैकी ४० टक्के घरे ही एक कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीची आहेत. विक्री झालेल्या एकूण घरांपैकी ३४,८९५ घरांची किंमत एक कोटी रुपयांपेक्षा अधिक होती. दुसरीकडे, ५० लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या घरांच्या विक्रीत दहा टक्क्यांची घट झाली. घरांच्या वाढत्या किंमती आणि महागडी कर्ज यामुळे ५० लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीच्या घरांच्या विक्रीत घट झाली. जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ या तिमाहीमध्ये घरांच्या विक्रीत मुंबई आघाडीवर असली तरी मागील वर्षीच्या तुलनेत हैदराबादमध्ये घरांच्या किंमतीत १३ टक्क्यांची वाढ झाली आहे.

दिवसेंदिवस सोन्या-चांदीच्या दरात मोठी वाढ होत आहे. एमसीएक्सवर सोन्याचे दर ७० हजार रुपयांच्या आसपास पोहोचले आहेत. सोन्याचा दर हा ६९ हजार ८०५ रुपयांवर पोहोचला आहे तर चांदीचा दर ८० हजार रुपयांच्या आसपास म्हणजे ७९ हजार ४११ रुपयांवर गेला आहे. त्यामुळे सोने खरेदी करणाऱ्यांच्या खिशाला कात्री लागत आहे. सध्या सोने खरेदी करणे अवघड झाले आहे. कारण सोन्याने ७० हजार रुपयांचा टप्पा गाठला आहे. फेब्रुवारी महिन्यात अनेक केंद्रीय बँकांच्या सोने भांडारात १९ टन सोने वाढले आहे. यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. बँका मोठ्या प्रमाणात सोन्याची खरेदी करत आहेत. यामुळे दरावर परिणाम होत आहे. 'पीपल्स बँक ऑफ चायना' ही बँक सोन्याची सर्वात मोठी खरेदीदार आहे. या बँकेत सोन्याच्या भांडारात २२५७ टन सोने आहे. गेल्या १६ महिन्यांपासून त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. 'नॅशनल बँक ऑफ कझाकिस्तान'मध्ये फेब्रुवारी महिन्यात सहा टन सोन्याची वृद्धी झाली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या सोने भंडारातही सहा टन सोन्याची वृद्धी झाली आहे. दरम्यान, 'यूएस फेडरल रिझर्व्ह'च्या दरात कपात होण्याची शक्यता असल्यामुळे सोने चांदीच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. एमसीएक्सवर सातत्याने सोन्याच्या दरात वाढ होत आहे. एमसीएक्सवर सोन्याचे दर गेल्या सहा महिन्यांमध्ये २३ टक्क्यांनी वाढले आहेत. दरातील ही वाढ मोठी मानली जात आहे. तसेच अनेक लोक गुंतवणूक करण्यासाठी सोन्याची खरेदी मोठ्या प्रमाणात करत आहेत. दरात वाढ होत असल्याने सोन्यामध्ये केलेली गुंतवणूक ही फायदेशीर ठरत आहे.

आजकाल

# वीज दरवाढीचा ग्राहकांना जबर शॉक

ऐन उन्हाळा सुरू असताना राज्यातल्या जनतेला महावितरणने वीज दरवाढीचा जबरदस्त धक्का दिला आहे. या दरवाढीचा फटका केवळ घरगुती वीजग्राहकच नव्हे, तर व्यापारी, उद्योजक आणि शेतकऱ्यांनाही बसणार आहे. सध्याच्या दरात प्रति युनिट मागे १५ ते ५२ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याने सर्वच वीजग्राहकांना हा भार सहन करावा लागणार आहे. घरगुती वीज ग्राहकांपुरते सांगायचे तर त्यांना दरमहा किमान पन्नास रुपये अधिकचे मोजावे लागणार आहेत. नवी वीजदरवाढ १ एप्रिलपासूनच लागू झाली आहे. घरगुती वीज ग्राहकांच्या वीज बिलात साडेसात टक्क्यांची वाढ होणार आहे, तथापि यात इंधन अधिभाराचा समावेश केला तर किमान दहा टक्के दरवाढ होणार आहे. शंभर युनिटपर्यंत विजेचा वापर होत असेल तर अशा वीज ग्राहकांना आता प्रतियुनिट ५ रुपये ५८ पैशांऐवजी ५ रुपये ८८ पैसे अशी दर आकारणी होणार आहे. १०० युनिटपेक्षा अधिक वीज वापर असल्यास युनिटमागे ११ रुपये ४६ पैसे आणि ३०१ ते ५०० युनिट असा वापर असेल, तर युनिटमागे १५ रुपये ७२ पैसे मोजावे लागणार आहे. वाढत्या महागाईने सर्वसामान्य माणूस आधीच त्रस्त झाला असताना आता विजेच्या दरवाढीने त्याचे कंबरडेच मोडले आहे. शेतकरी, उद्योजक आणि व्यापारीही या दरवाढीतून सुटलेले नाहीत. शेतीसाठी वीजपंपाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांना आता प्रति अश्वशक्ती ५२ रुपये खर्चावे लागणार आहे, तर शेतीच्या अन्य कामासाठी प्रति अश्वशक्ती १४२ रुपये मोजावे लागणार आहे. उद्योजक आणि व्यापारी वर्गही नव्या दरवाढीने भरडला जात असेल तर आश्चर्य नाही. देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील विजेचे दर अधिक असल्याची तक्रार व्यापारी आणि उद्योजक करीत असतातच. नव्याने झालेल्या वीजदरवाढीमुळे औद्योगिक प्रगतीलाही खीळ बसेल अशी शक्यता उद्योजक वर्गाकडून व्यक्त केली जात आहे. लघुदाब गटातील उद्योजकांसाठी २० किलोवॉटपर्यंत दरमहा ५३० रुपये मोजावे लागतात. त्यातही वाढ करण्यात आली असून, याच वर्गासाठी ५८३ रुपये मोजावे लागणार आहेत. पूर्वीच्या वीज मंडळाचे वीज कंपन्यांमध्ये परिवर्तन करूनही विजेचा कारभार सुधारण्याऐवजी त्यात आर्थिक शिस्तीचा आणि प्रशासकीय कौशल्याचा अभावच दिसतो. वीजगळती, विजेची चोरी यांचे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत वाढले असून, त्याचा भुर्दंड सर्वसामान्य वीजग्राहक, शेतकरी, उद्योजक आणि व्यापाऱ्यांवर लादला जात आहे.

वीज दरवाढीची कारणे सांगताना वीज गळतीत येणारा तोटा भरून काढण्यासाठी ही दरवाढ अनिवार्य असल्याचे म्हटले आहे. वीज निर्मितीपासून वीज वितरणापर्यंत जबाबदारी स्वतंत्र कंपन्याकडे सोपवण्याचा हेतु वीज मंडळाचे रूपांतर करण्यामागे होता; मात्र वीजनिर्मिती, वितरण आणि कारभारात पारदर्शकता हे हेतु साध्य झालेले नाहीत, त्यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांना कोणताही दिलासा मिळालेला नाही. अनेक ठिकाणी दिवसभरात कित्येक तास वीज गायब असते. विजेची बिले चुकीची किंवा अवास्तव येणे अशा तक्रारी कायमस्वरूपी असतात. सामान्य वीजग्राहकाने वीजबिल भरण्यात उशीर केला तर त्याची वीज तोडली जाते, मात्र राजकीय नेते, किंवा प्रभावशाली व्यक्ती यांना मात्र वेगळा न्याय लावला जातो. दरवाढीचा हा निर्णय महागाई वाढण्यावर आणि राज्यात नवे उद्योग येण्यावर विपरीत परिणाम करणारा ठरणार आहे. वाढत्या वीज खर्चामुळे उद्योजकाचा उत्पादन खर्च वाढतो आणि त्यांचे अर्थकारणच बिघडते. महानिर्मितीचा उत्पादन खर्च वाढला आहे, विजेची मागणी वाढत असताना ती पूर्ण करण्यासाठी महाग दराने वीज खरेदी करावी लागत आहे. ग्राहकांच्या वाढत्या थकबाकीमुळे महावितरणाला वीज दरवाढीचा पर्याय निवडावा लागतो, असे महावितरणचे म्हणणे आहे. ७५ हजार कोटींपेक्षा अधिकची थकबाकी असून, हा तोटा भरून काढण्यासाठी वीजदरवाढीशिवाय पर्याय नसल्याचे सांगण्यात येते; मात्र यात सर्वसामान्य वीजग्राहकच भरडला गेला आहे.

लोकसंसद

## भावपूर्ण श्रद्धांजली

रायगड जिल्हा पत्रकार संघाच्या माजी अध्यक्षा तसेच, शेकापक्षाच्या नेत्या आणि महाराष्ट्र राज्याच्या माजी राज्यमंत्री मा. मीनाक्षी ताई पाटील यांच्या जाण्याने पत्रकारितेचे शेकापक्षाचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या स्वभावात आवेश होता. आक्रमाची धार होती. त्याचबरोबर आदर आत्मियता आणि आत्संयमाची भावना होती. ताई जेव्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षा होत्या त्यावेळेस कृषीवल दैनिक कार्यालयामध्ये कवी बंधू जगदीश हे माझे मित्र नवीनच होते आणि ताईंची कुठल्या न कुठल्या कार्यक्रमात ताईंची भेट व्हायची. एक दिवस अचानक 'भडवळ' येथील त्यांच्या तुकाराम पाटील या मामांच्या भेटीसाठी पत्रकारासह जीप घेऊन आल्या असताना त्यांनी भाऊंना सांगितले म्हणजे ताईंच्या मामां आम्ही भाऊ म्हणायचो, आज ते नाहीत. त्यांनी मला निरोप पाठवून बोलवून घेतले. मी, गेलो असता ताई मला म्हणाल्या, अभंगे तुमचा मित्र कवी तुमची नेहमी गोष्ट काढतो. चांगला मुलगा आहे. त्यांच्यासाठी आम्ही सर्व पत्रकार मिळून आलो आहोत. तुमची बहीण आहे असे मला समजले आहे. मी म्हटले आहे माझी बहीण तिचेही यावर्षी लग्न करायचे आहे असे म्हणताच मीनाक्षीताई मला म्हणाल्या, जा ना तुमच्या बहिणीला इकडे घेऊन या आम्हाला बघायचे आहे. मी एक मिनीट त्यांचेकडे पहात बसलो, मात्र त्या पत्रकारांच्या समोर म्हणालो, ताई जेव्हा एखाद्या मुलीला पहायची असते तेव्हा त्या मुलीच्या घरी जाणे आवश्यक असते. माझी विनंती आहे, माझ्या झोपड्यात येऊन आपण माझ्या बहिणीला पाहल्यावर बरे वाटेल असे बोलताच ताई, आणि त्यांच्यासोबत आलेले पत्रकार जीपमध्ये बसले आणि माझ्या घरी आले. बहिणीला पाहिली थंड वगैरे घेऊन गेले आणि त्यांनी माझ्या बहिणीचे लग्न कवी जगदीश बंधूबरोबर जमवले. ताई विवाहप्रसंगात प्रमुख अतिथी होत्या. तेव्हा ताईंनी कुटुंबे बरीच उभी केली आहेत. पेझारी, पोयनाड, अलिबाग आणि रायगड जिल्हा परिषद शेकापक्षाचा बाले किल्ला संबोधला जात आहे. ज्यांना गरीबीची जाण आहे त्यांना जगात मान आहे. अशा मंडळींबद्दल आम्हा गोरगरीब ग्रामीण परिसरातील जनतेला सार्थ अभिमान. माणसे जातात पण त्यांच्या स्मृती जीवंत राहतात.

**- लक्ष्मण अभंगे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**बारा एप्रिल**

**१८७०:-** स्वातंत्र्यसेनानी, कर्नाटक सिंह अशी ओळख असणारे काँग्रेसचे नेतेख आत्मचरित्रकार गंगाधर बाळकृष्ण देशपांडे यांचा जन्म. 'माझी जीवनयात्रा' या आठवणीवजा आत्मचरित्रातून टिळक आणि गांधी यांच्या काळातील राजकारणावर प्रकाश तो. **१८७१:-** मुलांसाठीच्या 'आनंद' मासिकाचे संस्थापक-संपादक, व्याकरणाचे अभ्यासक, बाल साहित्य कार, अनुवादक वासुदेव गोविंद आपटे यांचा जन्म. 'मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, मराठी शब्दरत्नाकर' या त्यांच्या पुस्तकांनी भाषाज्ञान सर्वसामान्यांपर्यंत केले. 'बालभागवत', 'बालरामायण', 'महाराष्ट्राचा बालबोध इतिहास' अशी पुस्तके लिहून बाल साहित्यात महवाची भर घातली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्वर्यू व 'ज्ञानप्रकाश' चे संपादक अशीही त्यांची ओळख आहे. **१९१४:-** 'माझा राजबन्सी राणा । कोणी धुडून पाहाना' हे त्यांचे गीत त्या काळाची ख्यातनाम गायिका मेहबूबजान यांनी गायले. ते कवी संजीव तथा कृष्णा गंगाधर दिक्षित यांचा जन्म. उत्तम चित्रकार असणाऱ्या कवी संजीवांचा 'दिलरुबा' हा पहिला काव्यसंग्रह. त्यांनतर 'प्रियवंदा', 'माणुस', 'आघात' मिळून १२काव्यसंग्रह प्रसिध्द. त्यांनी वेगवेगळया प्रकारच्या कविता केल्या. त्यात 'गझलगुलाब', 'रंगबहार', 'देवाचिये घरी' असे गझल शायरी आणि अभंग प्रकार आहेत. याशिवाय पंधरा एक मराठी चित्रपटांची गीते त्यांनी लिहिली आहेत. त्यामध्ये 'चाळ माझ्या पायात, पाय माझे तालात' अशी शृंगारयुक्त आणि 'अखेरचा हा तुला दंडवत' अशी भावोत्कट पदे त्यांनी लिहिली. **१९२०:-** साहित्यिक शैलजा राजे यांचा जन्म. ३९ कथासंग्रह, ५३ कांदबऱ्या व २५ बाल कथा - कादंबरीका आणि काही ललित गद्यसंग्रह त्यांनी लिहिले. त्यापैकी 'कसम', 'वेगळ्या वाटा', 'बिदागी' त्यांचे गाजलेले कथासंग्रह तर 'खणा नारळाची ओटी हितगुजे' हे त्यांचे ललित गद्यलेखनाचे संग्रही लोकप्रिय झाले. त्यांचे लेखन प्रामुख्याने स्त्री पुरुष नात्यावर असून प्रेमविवाह, घटस्फोट, पुनर्विवाह आदी स्त्री विषयक समस्या आपल्या लेखनीतून मांडल्या. **१९३१ :-** ३०हून अधिक ग्रंथांना प्रस्तावना, ४० हून अधिक ग्रंथ परिक्षणे करणारे लेखक आणि वैदिक, संस्कृत साहित्याचे अभ्यासक अनुवादक वासुदेव गोविंद चोरघडे यांचा जन्म. त्यांच्या ग्रंथ संपदेत 'मंत्रगर्भ दत्तात्रेय स्तोत्र', 'महिषासुर मर्दिनी स्तोत्र', तसेच श्री वासंदेवानंद सरस्वतींची तीन नद्यांची स्तोत्रे 'सरिता स्तोत्र' मराठी अनुवादासह प्रकाशित अशी साहित्य संपदा. **१९३२:-** लेखक, कवी श्रीकांत दामोदर चौलकर यांचा जन्म. त्यांचा लेखाचा संग्रह ङ्गआखातफ या पुस्तकरुपाने प्रसिध्द. तसेच 'इंद्रधनू' हा काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९४१:-** शैक्षणिक विषयासंबंधीचे ग्रंथ लेखक शरद आत्माराम काथवटे यांचा जन्म. 'आधुनिक गणित भाग १,२', 'शालेय वार्षिक नियोजन', 'मुलभूत गणितीय संबोध' आणि 'शैक्षणिक ग्रंथ' त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९४२:-** कथा-कादंबरीकार डॉ.सुनिती जयंत आफळे यांचा जन्म. 'अतिथी', 'अनाथ', 'केवडा', 'रिकामी' इत्यादी कथासंग्रह आणि 'काजवे', 'चकवा' अशा कादंबऱ्या लिहिल्या. **१९४५:-** लेखक, प्रा. डॉ. यशवंत साधू यांचा जन्म. 'गवाक्ष', 'निळोबांची अभंगवाणी' या पुस्तकांसह 'सार्थ एकनाथी भारुडे' (संपादन) आणि 'भावार्थ एकनाथी भागवत व अनुभवामृतभाष्य' (सहसंपादन). याशिवाय 'मंथन' या पुस्तकातून शोधनिबंध, चर्चा आणि समीक्षा असे तीन विभाग केले असून त्यातून मध्ययुगीन मराठी संत साहित्य आणि संतसाहित्याच्या चिंतनाच्या अनुषंगाने काही सामाजिक, सांप्रदायिक व सांस्कृतिक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. **१९४९ :-** लेखक, चित्रकार तसेच गुलमोहरचे संपादक सुभाष त्रिंबक अवचट यांचा जन्म. धुरकट', 'मॅडम' या कादंबऱ्या त्यांच्या प्रकाशित झाल्या आहेत. **१९४९:-** लेखक, ॲड मनोहर सदाशिव पाटील यांचा जन्म. पेशाने वकील. ह्यांचे 'आनंदवनातील बाबाशाही', 'घटनेचा फेर विचार : एक ब्राम्हणी षडयंत्र' आणि 'फुले-आंबेडकरी चळवळीचे क्रांतिशास्त्र' ही वैचारिक स्वरुपाची पुस्तके त्यांची प्रकाशित झाली आहेत. **१९५५:-** लेखक विनय नारायणराव मिराडे यांचा जन्म. 'प्राणधून', 'अग्निकुंभ' हे काव्यसंग्रह आणि 'झिम्मक झिम्मा' हा बालगीतांग्रह प्रसिध्द. **१९५६:-** संत साहित्याचे अभ्यासक, कथाकथन, नाट्यदिग्दर्शन, अभिनय आदी क्षेत्रांवर ठसा उमटवणारे लेखक, भारुडकार डॉ. रामचंद्र अनंत देखणे यांचा जन्म. ह्यांनी आकाशवाणीवरुन 'आरसा', 'चालू जमाना' या सदरातून ५० श्रुतिका लिहिल्या. तथापि भारुडावर त्यांचा विशेष अभ्यास आहे. ह्यांच्या नावावर 'गोपानिनाद' ही कादंबरी आणि काही कथासंग्रह प्रसिध्द. **१९४९:-** चित्रकार तसेच 'धुरकटलेली, मॅडम' या कादंबऱ्या आणि 'जीए : एक पोर्ट्रेट' हे प्रयोगशील पुस्तक लिहिणारे सुभाष त्र्यंबक अवचट यांचा जन्म. 'स्टुडिओ' हे त्यांचे आत्मपर पुस्तक आहे. **१९६७:-** संपादनाच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे केशव रघुनाथ काशीकर यांचे निधन. 'थोरांच्या आठवणी भाग १' आणि 'पूर्णयोगी श्री अरविंद' अशी दोनच पुस्तके त्यांच्या नावावर आढळतात. **१९७७:-** रंजक आणि वाचनीय पुस्तकांचे लेखक भानू (भानुदास बळीराम) शिरधनकार यांचे निधन. गुन्हे/अधोविश्व, शिकारकथा त्यांनी साकारल्या, तसेच 'बेस्टसेलर्स' चे अनुवाद केले.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**




# शतायुषी मतदारासाठी पथक तीन राज्यांच्या सीमेवर

**। गडचिरोली । वृत्तसंस्था ।**

**वयाची शंभरी गाठलेल्या किष्टय्या आशालू मादरबोईना यांनी गृह मतदान सुविधेअंतर्गत लोकसभा निवडणूक - २०२४ साठी बुधवार (दि.११) आपले मतदान केले. त्यांच्यासाठी महाराष्ट्र, छत्तीसगड आणि तेलंगणा या तीन राज्यांची सीमा असलेल्या सिरोंचा येथे अनेक अडचणींचा सामना करून निवडणूक पथक पोहोचले.**

१०० वर्षीय मादबोईना यांच्यासोबतच किष्टय्या लसमय्या कोमेरा या ८६ वर्षीय वयोवृद्धानेदेखील गृहमतदान केले. हे मतदान घेण्यासाठी अहेरी विधानसभा मतदार संघातील गृह मतदान चमूने अहेरी ते सिरोंचा हे तब्बल १०७ किलोमीटरचे अंतर गाठले व गृह मतदानाची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर या दोघांचे मतदान नोंदविले. दोघेही वयोवृद्ध एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकत नाही त्यामुळे त्यांनी गृहमतदानाची निवड करून आपले मत घरातच स्थापन केलेल्या तात्पुरत्या मतदान कक्षात गोपनीयता बाळगून नोंदविले.



कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने यावर्षी प्रथमच ८५ वर्षांवरील मतदार आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

त्या अनुषंगाने गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी संजय दैने यांच्या मार्गदर्शनात ८ ते १४ एप्रिल या कालावधीत गृह मतदानाची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात बुधवारपर्यंत ८५ वर्षांवरील ९२३ मतदार आणि २८२ दिव्यांग, अशा एकूण १२०५ मतदारांनी आतापर्यंत गृह मतदानाद्वारे आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. संपूर्ण मतदार संघातून ८५ वर्षावरील १०३७ व ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेले ३३८ असे १३७५ मतदारांचे गृह मतदानासाठीचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी संजय दैने यांनी मंजूर केले आहेत.

निवडणुक आयोगाने लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी ८० वर्षांवरील मतदारांचे मतदान करुन घेण्यासाठी गृहमतदानाचा पर्याय ठेवला होता. ही संख्या अधिक असल्याने नंतर वयोमर्यादा ८५ वर्षांची करण्यात आली. त्यानुसार ८५ वर्षांवरील मतदारांची मतदान केंद्र अधिकाऱ्यांमार्फत माहिती संकलीत करण्यात आली. या मिळालेल्या माहितीनुसार त्या-त्या ठिकाणच्या जिल्हा निवडणुक शाखेने या सर्व मतदारांपर्यंत पोहोचून त्यांच्याजवळ हितगूज केले आणि ज्यांना गृहमतदान करावयाचे आहे अशा मतदारांसाठी गृहमतदानाचा पर्याय निवडणूक विभागाने उपलब्ध करुन दिल्याचा फायदा गडचिरोली येथील शतायुषी असणाऱ्या किष्टय्या आशालू मादरबोईन यांना झाला. त्यांना मतदान करता आले.

## मनसेमुळे भाजपचे नुकसान

**अकोला :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी नरेंद्र मोदी यांना पाठिंबा जाहीर केल्यामुळे भाजपचे नुकसान होणार असल्याचा दावा वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. मनसेच्या पाठिंब्यामुळे मुंबईत राहणाऱ्या उत्तर भारतीय मतदारांमध्ये नाराजी असल्याचे आंबेडकर यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना किंवा शिवसेना या दोघांनी आधी आंदोलन उभे केले होते. लुंगी हटाव पुंगी बजाओ असे आंदोलन उभे केले. त्यानंतर उत्तर भारतीयांच्या विरोधातील आंदोलन उभे केले. त्यांना मारहाण देखील केली. अशी एकूण परिस्थिती होती. राज ठाकरे यांनी मोदींना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे बिहारमधील जे नागरिक मुंबईत राहतात, उत्तर प्रदेशमधील मुंबईमध्ये राहणारे कार्यकर्ते ज्यांना भारतीय जनता पक्ष जवळचा वाटत होता, त्यांना आता असुरक्षित वाटत असल्याचे आंबेडकर म्हणाले.

## उदयनराजे भोसले तिकिटासाठी वेटींगवर

### भाजपाच्या दहाव्या यादीतही नाव नाही

**। सातारा । वृत्तसंस्था ।**

महाविकास आघाडीचं जागावाटप अंतिम झालेलं असताना सत्ताधारी महायुतीचा जागावाटपाचा तिढा मात्र अद्याप कायम आहे. त्यात काही जागांवर इच्छुक उमेदवारांनी दावे करायला सुरुवात केली आहे. त्यात साताऱ्याची जागा असून भाजपाचे राज्यसभा खासदार उदयनराजे भोसले यांनी साताऱ्याच्या जागेवर दावा केला आहे. यासंदर्भात पत्रकारांनी विचारणा केली असता उदयनराजेंनी त्यांच्या शैलीत उत्तर दिलं.



'आता मी राज्यसभेचा खासदार आहेच. पण लोकसभेविषयी विचाराल तर नक्कीच मी लोकसभेचा उमेदवार म्हणूनच तुमच्याशी बोलतोय', असं ते म्हणाले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाकडून शशिकांत शिंदे यांना साताऱ्यातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्याविषयी उदयनराजे म्हणाले, भाजप राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष आहे. दुसऱ्या पक्षांनी कुणाला उमेदवारी दिली माहिती नाही. लोकशाहीमध्ये कुणीही उमेदवार उभे करू शकतात.

भाजपाकडून खरंच उमेदवारी मिळेल का आणि न मिळाल्यास अपक्ष निवडणूक लढवणार का? असा प्रश्न उदयनराजे भोसलेंना विचारण्यात आला.

उमेदवारी मिळणार नाही हे तुम्ही कसं सांगू शकता? छोट्या लग्नाच्या याद्या करणं सोपं असतं. पण हे मोठं लग्न आहे. याला वेळ लागेल. मी सगळंच नियोजन आत्ता सांगितलं, तर समोरच्या उमेदवाराला सगळंच आयतं मिळेल. कसं करायचं ते मी बघतो, असं उदयनराजे भोसले म्हणाले.

## वे|ध|क

### ' साताऱ्याची जनता माझ्यासोबतच '

**सातारा :** ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अखेरीस आमदार शशिकांत शिंदे यांना मैदानात उरवले आहे.दरम्यान, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सातारा हा शरद पवारांच्या विचारांचा जिल्हा आहे. दोन्ही राजे समोर असले, तरी साताऱ्याची जनता माझ्यासोबत आहे. सातारा मतदारसंघातील जनता राष्ट्रवादीलाच विजयी करेल, असा विश्वास आमदार शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केला.

### 'मोदींना देशात पुतीन मॉडेल हवे'

**मुंबई :** नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाची प्रतिष्ठा ज्या पद्धतीने खाली आणली आहे. ते देशातील संविधान आणि लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे. राजकारणात खोटे बोलतात मात्र, पंतप्रधान पदावरील व्यक्तीने मर्यादा पाळायला हव्यात. पंतप्रधान पदाची प्रतिष्ठा त्यांनी पाळायला हवी, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींना देशात पुतीन मॉडेल आणायचे असल्याचा आरोपही त्यांनी केला. लोकशाहीमध्ये विरोधकांना देखील महत्त्व असते हे मानायला पंतप्रधान नरेंद्र मोदी तयार नाहीत. हा संविधानासाठी धोका आहे, असे राऊत म्हणाले.

### धैर्यशील पाटील १४ एप्रिलला राष्ट्रवादीत

**माढा :** माढा लोकसभा मतदारसंघातले नाराज धैर्यशील मोहिते पाटील यांनी शरद पवारांची भेट घेतली असून त्यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातला प्रवेश निश्चित झाला आहे. १४ एप्रिल रोजी त्यांचा पक्षप्रवेश होणार असून १६ एप्रिलला ते उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. भाजपने निंबाळकरांना उमेदवारी दिल्यानंतर धैर्यशील मोहिते पाटील नाराज होते. त्यामुळे आता रणजितसिंह निंबाळकर विरुद्ध धैर्यशील मोहिते पाटील अशी लढत होणार आहे.

## विजय वडेट्टीवार यांचा लवकरच भाजपमध्ये प्रवेश ?

### धर्मरावबाबा आत्राम यांचा दावा

**। गडचिरोली । वृत्तसंस्था ।**

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी राज्याचे विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असा दावा केल्याने ऐन निवडणुकीत खळबळ उडाली आहे. यावर वडेट्टीवार यांनी प्रत्युत्तर देत दावा तथ्यहीन असल्याचे सांगितले.

गडचिरोली-चिमूर लोकसभेसाठी महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संपूर्ण शक्ती पणाला लावली आहे. काँग्रेसकडून विरोधी पक्षनेते वडेट्टीवार तर महायुतीकडून मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यात कलगीतुरा रंगल्याचे चित्र आहे. महायुतीला पराभव समोर दिसत असल्याने त्यांचे नेते काहीही दावे करत सुटले आहेत. मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांना पराभव झाला की मंत्रिपद जाईल याची भीती आहे. ते मला त्रास देण्यासाठी असा दावा करीत आहे. ते जर खरंच कथित बैठकीत हजर होते तर त्यांची नार्कोटेस्ट करा, सत्य काय ते समोर येईल. आत्राम यांनी स्वतःच्या क्षेत्रातून भाजपला लीड मिळवून द्यावे असे आव्हान वडेट्टीवार यांनी केले आहे.



## चंद्रकांत दादांना विचारला जाब

**माढा :** विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा प्रचार करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी प्रदेशाध्यक्ष मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीमध्ये शेतकऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या बैठकीतच एका शेतकऱ्याने चंद्रकांत पाटील यांना जाब विचारला. त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. त्यावेळी चंद्रकांत पाटील यांनी सर्वांना शांत राहण्याचा आवाहन केले.

## तर पंतप्रधान मोदींसह भाजपा नेत्यांना तुरुंगात टाकू

### मीसा भारती यांचे विधान, भाजपानेही दिलं प्रत्युत्तर

**। बिहार । वृत्तसंस्था ।**

आगामी लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडी सत्तेत आली, तर पंतप्रधान मोदी यांच्यासह भाजपाच्या नेत्यांना तुरुंगात टाकलं जाईल, असं विधान लालू प्रसाद यादव यांची मुलगी तथा बिहारमधील पाटलीपुत्र मतदारसंघाच्या आरजेडीच्या उमेदवार मीसा भारती यांनी केलं आहे. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.



दरम्यान, मीसा भारती यांच्या विधानानंतर भाजपाने इंडिया आघाडीवर जोरदार पलटवार केला असून इंडिया आघाडीच्या नेत्यांकडून अगदी खालच्या पातळीचं राजकारण केलं जात आहे, असा आरोप भाजपाचे नेते विनोद तावडे यांनी केला आहे. दहशतवाद्यांना किंवा भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात टाकण्याऐवजी आघाडीकडून मोदींना तुरुंगात टाकण्याची धमकी दिली जात आहे. हे दुर्दैवी आहे, असेही ते म्हणाले.

## मोदींनी भाजपचे नाव मिटवले, आरएसएस संपवली

### प्रकाश आंबेडकरांनी केला आरोप

**। यवतमाळ । वृत्तसंस्था ।**

आरएसएस व्यक्तीविरोधी आहे. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाजपचे नाव मिटवले, आरएसएस संपविली, असं वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. वणी येथे ते बोलत होते.



प्रकाश आंबेडकर म्हणाले, आरएसएस व्यक्तीविरोधी आहे, परंतु मोदींनी भाजपचे नाव मिटविले, आरएसएस संपविली, कारण दीड वर्षात ते मोहन भागवतांना भेटायला गेले नाहीत. भागवतांनी वेळ मागूनही ती दिली नाही. पक्ष टिकले तर देशाचा एकोपा टिकतो त्यामुळे संघ व सनातन वाद्यांनी मोदींचं भूत मानगुटीवरून उतरविण्यासाठी मदत करावी, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

## तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यास उद्यापासून सुरुवात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीचे तिसऱ्या टप्प्यातील मतदान येत्या ७ मे रोजी होणार असून यासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास शुक्रवारपासून सुरुवात होणार आहे. तिसऱ्या टप्प्यात १२ राज्यांतील ९४ जागांसाठी मतदान होणार आहे. यात महाराष्ट्रातील ११ मतदारसंघांचा समावेश आहे. राज्यातील बारामती, रायगड, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरीसिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या जागांसाठी ७ मे रोजी मतदान होईल.



१२ राज्ये/केंद्रशासित प्रदेशातील ९४ जागांसाठीची अधिसूचना शुक्रवारी काढली जाणार असल्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले. मध्य प्रदेशातील बैतूल मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार होते. तथापि याठिकाणी अर्ज भरलेल्या बसपाच्या उमेदवाराचे निधन झाल्याने याठिकाणचे मतदान तिसऱ्या टप्प्यात घेतले जाणार आहे. या टप्प्यात महाराष्ट्र ११ जागा, गुजरात २६, कर्नाटक १४, उत्तर प्रदेशातील १०, मध्य प्रदेशातील ८, छत्तीसगडमधील ७, बिहारमधील ५, आसाम आणि प. बंगालमधील प्रत्येकी ४, गोवा राज्यातील २, दादरा नगर हवेली, दमन आणि दीवमधील २ व जम्मू काश्मीरमधील एका जागेवर मतदान होणार आहे.

## मोदी सभा घेतील तिथे भाजपचा पराभव

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

पुण्यात लोकसभेच्या निवणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. रवींद्र धंगेकरांच्या प्रचारासाठी राहूल गांधी आणि प्रियंका गांधी येणार असल्याची माहिती आहे. त्यावर भाजपकडून निशाणा साधण्यात आला आहे. जिथे राहुल गांधी प्रचार करतात तिथे काँग्रेसचा पराभव होतो, असं भाजपचं म्हणणं आहे तर त्यावर पुणे लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर रवींद्र धंगेकरांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. ज्या लोकसभा मतदारसंघात मोदी प्रचार करतील त्या मतदारसंघात भाजपचा पराभव निश्चित असल्याचा हल्लाबोल, धंगेकरांनी केला आहे. एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी मोदींवर निशाणा साधला आहे.



**रवींद्र धंगेकरांचा दावा**

## छत्रपती घराण्याचा अपमान करणाऱ्या संजय मंडलिकांनी माफी मागावी

### सतेज पाटील यांचा हल्लाबोल

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

शाहू महाराज यांच्यावरील टीका संजय मंडलिक स्वतःच्या स्वार्थासाठी करत आहेत, कोल्हापूरकर अपमान सहन करणार नाहीत, सुरुवात त्यांनी केलीय, शेवट कोल्हापूरची जनता करेल अशा शब्दात काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांनी संजय मंडलिक यांना फटकारले आहे.



संजय मंडलिक यांनी केलेल्या वक्तव्यावर त्वरित माफी मागावी, अशी मागणी सतेज पाटील यांनी केली. कोल्हापूरकर हा अपमान सहन करणार नाहीत, हा छत्रपती घराण्याचा अपमान केला आहे. कुठल्याही परिस्थितीत जनता भीक घालणार नसल्याचेही ते म्हणाले.

सतेज पाटील म्हणाले की, यांच्या पायाखालची वाळू घसरत चालली आहे. कोण सल्लागार आहेत माहीत नाही की स्वतः आहेत माहीत नाही. कुस्ती करा पण खालच्या पातळीवर टीका योग्य नसल्याचे सतेज पाटील म्हणाले. ते म्हणाले की, शाहू महाराजांवरील टीकेला कोल्हापूरची जनता योग्य उत्तरे देईल. शाहूप्रेमी याचा निषेध व्यक्त करतील, असे सांगितले. त्यांनी सांगितले की, महाराजांवर आम्ही वैयक्तिक टीका करणार नाही, असे सांगितले होते.

## बीआरएसपुढे अडचणींचा डोंगर

**। तेलंगण । वृत्तसंस्था ।**

तेलंगण आणि के.चंद्रशेखर राव ऊर्फ के. सी.आर. ही ओळख गेल्या दहा वर्षांपासून होती. राष्ट्रीय पातळीवर राजकारणात प्रवेश करण्यासाठी के.सी.आर यांनी तेलंगण राष्ट्र समिती पक्षाचे नाव बदलून भारत राष्ट्र समिती केले. या नावानुसार त्यांनी तेलंगणच्या शेजारील राज्यांमध्ये हातपाय पसरण्यास सुरुवात केली.

- नेते, आमदार अन्य पक्षांच्या शोधात
- अनेक मतदारसंघात प्रभावी उमेदवारांची कमतरता
- अनेक नेत्यांवर फोन टॅपिंगसह भ्रष्टाचाराचे आरोप
- दिल्लीतील मद्य गैरव्यवहारात के.सी.आर यांची मुलगी के. कविता यांना ईडीकडून अटक
- फोन टॅपिंगप्रकरणात आतापर्यंत चार पोलिसांना अटक



विधानसभा निवडणुकीत काँग्रेसकडून चितपट झाल्यानंतर के.सी.आर राव आणि त्यांच्या पक्षाला आता अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पक्षाचे नेते व आमदारही सोडून जाऊ लागले आहेत.

आंध्र प्रदेशचे विभाजन होऊन वेगळ्या तेलंगण राज्याची निर्मिती झाल्यानंतर के. सी.आर. राव यांच्या पक्षाला निवडणुकांमध्ये मोठे यश मिळाले होते. सरकार आणि पक्षाला मजबूत करण्यासाठी, काँग्रेस व तेलुगू देशम पक्ष फोडण्यासाठी त्यांनी जे धोरण राबविले होते, तेच त्यांच्यावर आता उलटले आहे.

> विधानसभा निवडणुकीत भारत राष्ट्र समितीला दारुण पराभव झाल्यानंतर तेलंगणमध्ये राजकीय चित्र पूर्णपणे पालटले आहे. विधानसभेनंतर वर्षभरातच लोकसभा निवडणुकीला सामोरे जाताना 'बीआरएस'ला पुन्हा उभे राहण्यासाठी वेळ लागणार आहे.
>
> - एम.ए.एस कुमार

कधी, कोणता आमदार काँग्रेसचा हात धरेल याचा अंदाजही करू शकत नाही, अशी स्थिती आहे.

## राजकीय आखाड्यात डबल महाराष्ट्र केसरी

**। सांगली । प्रतिनिधी ।**

डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या रुपाने कुस्तीच्या आखाड्यातील यशवंत मल्ल सांगलीची लोकसभा निवडणूक लढवतो आहे. विधानसभा आणि लोकसभेसारख्या मोठ्या आखाड्यात जिल्ह्यातील मोजक्या मल्लांनी आपले नशीब आजमावले. त्यात बिजलीमल्ल संभाजी पवार आणि खासदार संजय पाटील हे सर्वांत यशस्वी पैलवान मानले जातात. खासदार संजय पाटील कुस्तीपेक्षा राजकीय आखाड्यात अधिक यशस्वी झाले. हिंदकेसरी मारुती माने राज्यसभेत गेले; त्यांना लोकसभेची कुस्ती जिंकता आली नाही.

यावेळी, चंद्रहार पाटलांच्या रुपाने एका पैलवानाला संधी देतोय,असे ते म्हणाले. याआधी कुस्तीचा आखाडा गाजवत असलेल्या पैलवानाला राजकीय आखाड्यात खांद्यावर घेण्याची पहिली मोठी खेळी झाली, ती संभाजी पवार यांच्या रुपाने. वसंतदादा पाटील राजस्थानचे राज्यपाल झाले. सांगली विधानसभेची पोटनिवडणूक लागली. विष्णुअण्णा पाटील यांना काँग्रेसने उमेदवारी दिली. संभाजी पवार नवखे होते, मात्र विरोधकांचा चेहरा म्हणून त्यांना मैदानात उतरवण्यात आले.



आबासाहेब खेबुडकर यांनी विरोधकांची मोट बांधली. हिंदकेसरी मारुती माने, राजाभाऊ जगदाळे, व्यंकाप्पा पत्की आदी मंडळींनी त्यांच्या मागे प्रचंड ताकद उभी केली. पाहता-पाहता निवडणूक उभी राहिली आणि लाल मातीत बिजली चमकावी, तशी झटकन कुस्ती करणारे संभाजी पवार सर्वांना धक्का देत आमदार झाले. पुढे, चार वेळा ते विधानसभेत गेले. हिंदकेसरी मारुती माने यांचा कुस्ती क्षेत्रात देशभर दबदबा होता. एखादा छाती पुढे काढून रुबाबात चालायला लागला तर लोक त्याला, मारुती माने लागून गेलास काय?असं म्हणायचे. मारुती माने यांना वसंतदादांनी राज्यसभा सदस्य करून त्यांचा सन्मान केला. खासदार संजय पाटील हे कुस्तीपेक्षा अधिक राजकारणात प्रभावी ठरले. युवक काँग्रेसचे अध्यक्ष, सांगली नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष, विधान परिषदेचे आमदार आणि दोनवेळा खासदार म्हणून त्यांची राजकीय कमान चढती राहिली आहे. मात्र राजकारणात संजय पाटील, संभाजी पवार आणि मारुती माने यांच्याइतके यश अन्य मल्लांच्या नशिबी आले नाही. हिंदकेसरी गणपतराव आंदळकर, वनश्री नाना महाडिक, डबल महाराष्ट्र केसरी गणपतराव खेडकर, महाराष्ट्र केसरी दिनकर दह्यारी, महाराष्ट्र केसरी आप्पासाहेब कदम, भारतभीम ज्योतिरामदादा सावर्डेकर, कडेगावचे साहेबराव यादव, भीमराव माने, किसनराव पाटील यांच्यासह अनेक मंडळी राजकीय आखाड्यात प्रभावी ठरली.

## वर्ध्यात रामदास तडस कुटुंबात वादाचा तडका

### सासरा विरुद्ध सून लढत रंगणार

**। वर्धा । वृत्तसंस्था ।**

वर्धा लोकसभा निवडणुकीत सासरे विरुद्ध सुनबाईंची लढत रंगणार आहे. भाजपकडून रामदास तडस यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर त्यांच्या विरोधात त्यांच्या स्नुषा पुजा तडस या अपक्ष म्हणून निवडणूक लढवणार आहेत. पूजा तडस यांनी रामदास तडस यांच्यावर आणि संपूर्ण तडस कुटुंबियांवर गंभीर आरोप केले आहेत.



रामदास तडस यांच्या सून पूजा तडस यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली. अर्ज मागे घेण्याची मुदत संपेपर्यंत हा अर्ज अद्याप परत घेतला गेला नाही.

# रायगडात रमजान ईद उत्साहात




**मुस्लिम धर्मियांचा रमजान महिन्यातील पवित्र समजला जाणारा महिना संपला आहे. त्यानिमित्ताने गुरूवारी (दि.११) रमजान ईद साजरी करण्यात आली. या निमित्त रायगडात ठिक-ठिकाणी सकाळपासूनच मुस्लिम बांधवांनी नमाज अदा करण्यासाठी गर्दी केली होती. तसेच, सर्व मुस्लिम बांधव मशिदीबाहेर आल्यानंतर त्यांचे स्वागत पोलिसांनी गुलाब पुष्प देवून करण्यात आले.**



## जंजिरा किल्ल्यासमोर नमाज अदा

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

मुरुड परिसरात रमजान ईद हा सण मोठ्या उत्साह-त साजरा होतो. ईदची पहिली नमाज नावाबकालीन इदगाहवर मुस्लीम बांधव अदा करतात. इदगाहची नमाज होताच मुरुड पोलीस ठाणे कडून पीआय प्रकाश सकपाळ व सहकारी यांनी गुलाब फुल देऊन सर्व बांधवाना शुभेच्या दिल्या. सोबत परेश म्हात्रे उपस्तित होते. संपूर्ण भारतात अनेक ईदगाह आहेत, परंतु मुरुड शहराच्या बाहेरील काही किलोमीटर अंतरावर असलेली ही ईदगाह वेगळी आहे. हा ईदगाह पूर्व आफ्रिकन वंशाच्या जंजिरा संस्थानातील सिद्दी शासकांनी बांधला आहे.



राजपुरी गावचे मुस्लीम बांधव सकाळी ७ वाजता ईदची पहिली नमाज जंजिरा किल्लीसमोर इदगाहवर अदा करतात. हा इदगाह जंजिरा किल्ल्यासमोर समुद्रकिनारी असल्याने नमाज पडताना मागे किल्ला दिसतो.

## पोलिसांकडून मुस्लिम बांधवांना गुलाब

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत आणि नेरळ पो-लीस ठाणे हद्दीतील मुस्लिम धर्मियांनी रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी केली. मशिदीमध्ये नमाज अदा करण्यासाठी येणाऱ्या मुस्लिम बांधवांना कर्जत आणि नेरळ पोलीसांनी गुलाब पुष्प देवून ईद निमित्त शुभेछा दिल्या.



कर्जत येथील सुन्नी मशीद येथे सकाळ पासून नमाज अदा करून ईद साजरी करण्यासाठी मुस्लिम लोकांनी गर्दी केली होती. ते सर्व मुस्लिम बांधव मशिदीबाहेर आल्यानंतर त्यांचे स्वागत कर्जत पोलिसांनी गुलाब पुष्प देवून केले. यावेळी पोलीस उप अधीक्षक डी. डी. टेले, कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी आपल्या पोलीस कर्मचारी यांच्यासह उपस्थित राहत शुभेछा दिल्या. नेरळ येथील जामा मशीद बाहेर नेरळ पोलिसांकडून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

### तुपगावमध्ये रमजान ईद साजरी

**। रसायनी । वार्ताहर ।**

तुपगावमधील मोहल्यातही मोठ्या उत्साह व आनंदात रमजान ईद साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच रवींद्र कुंभार यांनी सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देवून घरोघरी जाऊन मिठाई वाटप केले. यावेळी कांता नागावकर, नंदू सोनवणे, विजय ठोसर, स्वप्नील नागावकर, अमिन भालदार, योगेश गुरव, राम मोरे, मनोज कुंभार, प्रवीण आडावकर आदीसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सर्व ग्रामस्थांनी मुस्लिम बांधवांना गळा भेट देऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.



● अलिबागमधील जामा मशिदीत नमाज अदा केल्यानंतर रायगड पोलिसांनी मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्या.



● पनवेलच्या मुस्लिम नाक्यावर मुस्लिम बांधवानी नमाज अदा केल्यावर महानगरपालिका माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्याकडून मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.



● अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथे रमजान ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना पोयनाड पोलीस ठाण्यातर्फे गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.



● रमजान ईद निमित्त पनवेलच्या मुस्लिम बांधवांनी पनवेलच्या ईदगाह येथे नमाज अदा केली. यावेळी मोठ्या प्रमाणावर लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.



**रमजान ईद निमित्त अलिबाग तालुक्यातील शेखाचे गाव येथील अरफान मुस्ताक कुरेशी या सहा वर्षीय लहानग्याने रमजानचे सर्व रोजे यशस्वीपणे पुर्ण केल्याने त्याचे विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.**

## म्हसळ्यात रमजान ईद

**। म्हसळा । वार्ताहर ।**

मुस्लिम समाजाचा पवित्र असा रमजान महिन्याचे उपवास बुधवारी समाप्त झाले आणि गुरूवारी अतिशय उत्साहात आणि आनंदी वातावरणात ईदचा सण साजरा करण्यात आला. यावेळी म्हसळ्यातील मुस्लिम समाजातील हजारो लहानांपासून थोरांपर्यंत बंधू भगिनींनी ईदगाह येथे एकत्रित जमून ईदची नमाज अदा केली. याप्रसंगी नाझिम चोगले, विभागीय पोलीस अधिकारी डॉ. विवेक बुगरीकर, प्रांताधिकारी महेश पाटील, तहसीलदार समीर घारे, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, जिल्हा वाहतूक नियंत्रक पोलीस निरीक्षक संदीपान सोनवणे, पोलीस निरीक्षक पवन चौधरी, नगराध्यक्ष संजय कर्णिक, नाजीम हसवारे, समीर बनकर, धर्मराज पाटील, गणेश तेलंगे, फझल हलडे, शाहिद उकये, सईद अहमद कादिरी, शहानवाज उकये आदि मान्यवर, मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## नागोठण्यात सदिच्छांची देवाणघेवाण

**। नागोठणे । वार्ताहर ।**

जिल्ह्यात ठिकठिकाणी ईदचा उत्साह असतानाच मुस्लीम बांधवांचा पवित्र व ऐक्याचा सण असलेली रमजान ईद नागोठणे शहर व विभागातील बेणसेसह इतर ठिकाणी येथील मुस्लीम बांधवांनी हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. राजकीय नेतेमंडळींपासून ते सर्वसामान्य नागरिकांनी ईदच्या या पर्वात सहभागी होत मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या. पोलिस उपअधीक्षक शैलेश काळे, सहाय्यक पोलिस निरिक्षक हरेश काळसेकर, पोलिस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, हे.कॉ. विनोद पाटील, महेश लांगी यांनी शहरा-तील मुख्य जामा मस्जिद येथे जाऊन सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. यासह मुस्लीम बांधवांनीही ईदची दुआ करताना सर्वांना सुख समाधान मिळण्यासह सलोख्यात वाढ व्हावी, अशी दुआ अल्लाहकडे मागितली.



## सचिन राऊळ यांना डॉक्टरेट

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन शरद राऊळ यांना त्यांनी केलेल्या समाजकार्याची दखल घेऊन अमराव-ती येथील छत्रपती शिवाजी महाराज लोकविद्यापिठाकडून समाजकार्यासाठी डॉक्टरेट पदवी प्रधान करण्यात आली. नाशिक येथील प. सा. नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय कृषी शास्त्रज्ञ डॉ. रमेश ठाकरे यांच्या हस्ते सचिन राऊळ यांना डॉक्टरेट पदवी देण्यात आली.



यावेळी नवी दिल्ली येथील इफ्कोच्या संचालिका साधना-ताई जाधव, छत्रपती शिव-ाजी महाराज लोकविद्यापिठाचे महासंचालक डॉ. मंगेश देशमुख, चेन्नई येथील एम.एस. स्वामीना-थन रिसर्च फाऊन्डेशनचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. एन. परशुरामन आदी मान्यवर उपस्थित होते.

अलिबाग तालुक्यतील ना-गाव येथील सचिन राऊळ हे अनेक वर्षे निस्वार्थीवृत्तीने समाजकार्य करीत आहेत. घरातून कोणतीही राजकीय व सामाजिक पार्श्वभूमी नसताना सचिन यांनी आपल्या स्वकतृत्वावर समाजात नावलौकीक मिळविला आहे तो त्यांच्या समाजाप्रती असलेल्या प्रेमामुळे.

## निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

**। अलिबाग । वार्ताहर ।**

नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळ नवीन पनवेल तर्फे दि.८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त मंडळातर्फे निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. निबंध स्पर्धेचा विषय 'आजच्या काळात महिलांचे समाजातील मानाचे स्थान' हा होता. गुढी पाडव्याच्या दिवशी बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी प्रथम क्रमांक भारती पोतदार, व्दितीय क्रमांक शारदा भामरे, तृतीय क्रमांक संगीता विसपुते आणि उत्तेजनार्थ डॉ. दिपाली विसपुते या निबंधस्पर्धेतील विजेतांना पुरस्कार व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.याप्रसंगी संजय खरोटे, संगीता विसपुते, अ‍ॅड. शाम विसपुते, भास्कर भामरे आदी उपस्थित होते.



### कारंजाडेकर त्रस्त

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नळाद्वारे होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे करंजाडे वसाहतीमधील नागरिक त्रस्त आहेत. गुढीपाडवा नववर्षाच्या पहिल्या दिवशी करंजाडेवासियांच्या नळांमध्ये पिण्याचे पाणी आले नसल्याने त्यांनी पाणीपुरवठा करणाऱ्या यंत्रणेबद्दल संताप व्यक्त केला.

करंजाडे वसाहतीमधील सेक्टर ४ मधील मेघना शिवम गृहनिर्माण संस्थेमध्ये मंगळवारी सायंकाळी वसाहतीमधील अनेक गृहनिर्माण संस्थांच्या पदधिकाऱ्यांनी एकत्र येऊन नेमके काय करता येईल याविषयी बैठक घेतली. लाखो रुपये किमतीचे घर खरेदी केले. पिण्याचे पाणी मिळत नसल्याने लेखी पत्रव्यवहार, सिडको मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या भेटी आणि बेलापूर येथील सिडको भवनावर हंडा मोर्चा काढला. परंतु, अजूनही करंजाडेवासियांचे पाणी हाल संपलेले नाहीत.

## पळसदरी येथे गुणवंतांचा सन्मान



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे स्वामी समर्थ महाराज यांचा प्रकट दिन साजरा करण्यात आला. स्वामी समर्थ प्रकट दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात नाव कमावलेल्या गुणवंत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

प्रगटदिनानिमित्त पहाटेपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी हेमांगी पाकणीकर आणि सहकारी यांचा सुर संस्कार प्रस्तुत भक्तीनाद हा भक्ती गीतांचा कार्यक्रम सादर केला. पळसदरी स्वामी समर्थ मठ प्रकटदिन सोहळ्याचे निमिताने विविध क्षेत्रात नाव कमावलेल्या व्यक्तींचा 'आठवण पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. त्यात डॉ. नितीन आरेकर, दिनेश अडावदकर यांचा अ‍ॅड. राजेंद्र निगुडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर, प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलाला डॉक्टर केले त्याबद्दल आदर्श पालक म्हणून रेवती केवरी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विक्रांत दरेकर, राजू पोतदार आदी उपस्थित होते.

## वणव्यात हजारो वृक्षांचे नुकसान

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

मार्च महिन्यापासून अनेक ठिकाणी वणवा लागल्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. नुकतेच वाळंजवाडी डोंगरावर प्रचंड प्रमाणावर वणवा लागला होता. या वणव्यात अनेक लहान मोठी झाडे आगीच्या भक्षस्थानी गेली. हजारो झाडांना झळ पोहचून क्षणार्धात राख झाली.

तसेच, भाले गावापासून काही अंतरावर सपाट मैदानाला वणवा लागला. या वणव्याने अनेक झाडे बेचीराख केली. रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या अनेक प्रवाशांना आगीची झळ लागत होती. प्रचंड धुरात रस्ता दिसेनासा झाला होता. दुपारची वेळ असल्यामुळे प्रचंड प्रमाणावर वाऱ्याचा वेग होता.

## सी प्राईड रेस्टोरंटचे उद्‌घाटन

**। उरण । वार्ताहर ।**

बेलापूर येथील सेक्टर १५ साई विहार येथे सुवर्णा कासवलेकर, सदानंद हजार, अभिषेक हजारे, जय कासवलेकर, ययाती हजारे या मराठी माणसांनी एकत्र येत सी प्राईड रेस्टॉरंट तयार केले. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर या रेस्टोरंटचे उद्‌घाटन आ. मंदा म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भीमसेन माळी, जयेंद्र खुणे, गणेश कोळी, मिथुन पाटील, अमित पाटील, अरुण पेदे, एसीपी साळवे, उद्योजक दुधे, नाईक, सावळेकर आदी उपस्थित होते. यावेळी मनोरंजन साठी गायक मनोहर फुंडेकर यांच्या गायनाचा कार्यक्रम पार पडला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही. असे दोन २ BHK फ्लॅटस त्वरीत विकणे आहेत. पहिल्या फ्लॅटची किंमत ७३ लाख व दुसऱ्या फ्लॅटची किंमत ८३ लाख संपर्क : ८६९८६८२१२१

● भेरसे येथे ३० गुंठे जागा विकणे आहे व वावे नाक्यावर जागा विकणे आहे. तसेच मुरूड बीचपासून १२ कि.मी. अंतरावर रोडटच १ एकर जागा विकणे आहे. मो. ८२०८२९०६६२/९३७०१२६२५

● पुरूष रिसेप्शनिस्ट पाहिजे स्विमींग पूल तासिका/मासिक तत्वावर उपलब्ध. ८३९०४२४२२२/९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## रस्ते डांबरीकरणात धोकादायक साईडपट्ट्या

### रुग्णवाहिका चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे वाचले दुचाकीस्वाराचे प्राण

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरूड तालुक्यातील मुख्य रस्त्याच्या डांबरीकरणात दुतर्फा असलेल्या साईड पट्ट्या धोकादायक ठरत आहेत. या साईड पट्ट्या न भरल्यामुळे दुचाकी अपघातात वाढ होत असल्याचे समोर येत आहे. नुकताच एका रुग्णवाहिका चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे दुचाकीस्वाराचा प्राण वाचला आहे. या नवीन रस्त्याच्या साईड पट्ट्या लवकरात लवकर भरण्याची मागणी वाहन चालकांकडून होत आहे.

साळाव-मुरूड-आगरदांडा रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम जोरदार चालु आहे. परंतु, हे रस्ते करत असताना रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या साईड पट्ट्या काही ठिकाणी ६ इंचा पेक्षा जास्त खोल झाल्याने त्या धोकादायक ठरत आहेत. त्यामुळे दिवसात एक तरी अपघात होत आहे. हे रस्ते करत असताना ताबडतोब साईड पट्ट्या भरणे गरजेचे असताना त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांच्या अपघात वाढ होत असल्याचे समोर येत आहे.



यातच मुरूड-आगरदांडा रस्त्यावर दुचाकी स्वाराचा प्राण रुग्णवाहिका चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे वाचला आहे. आगरदांडा येथील रुग्णवाहिकेचे चालक निकेतन सुर्ते रुग्णवाहिका घेऊन मुरूडच्या दिशेने जात असताना समोरून येणारा दुचाकीस्वार रुग्णवाहिकेला रस्ता देण्यासाठी साईड पट्टीवर उतरत असताना या खोल साईड पट्टीमुळे दुचाकी घसरली व दुचाकीस्वार रुग्णवाहिकेच्या चाकाखाली येत असताना रुग्णवाहिका चालकाच्या प्रसंगावधानतेने रुग्णवाहिका थांबवून प्राण वाचविले आहे. हे बनविलेले रस्ते अरुंद असल्याने अचानक मोठी गाडी आली की दुचाकीस्वारांना रस्त्याच्या खाली उतरावे लागते. पण या साईड पट्ट्या ६ ते ८ इंच खोल असल्याने दुचाकी घसरून अपघात होत आहेत.

# कर्जतमधील भाजप मुख्यालय नक्की कोणते?

### तीन वेगवेगळ्या ठिकाणी कार्यकर्त्यांचे शक्तिप्रदर्शन
### लोकसभा निवडणुकीवर परिणाम होणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे हे उमेदवारी जाहीर झाल्यावर कर्जत मतदारसंघात आले. श्रीरंग बारणे यांनी कर्जत येथे येण्याअगोदर शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय आठवले गट या महायुतीच्या घटक पक्षांना संपर्क साधून कार्यकर्त्यांची ओळख परेड करण्यासाठी बैठक लावण्याची सूचना केली होती. त्यावेळी या चार प्रमुख पक्षांनी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठका लावल्या आणि उमेदवार आणि खासदार बारणे त्या बैठकांना हजर राहिले. दरम्यान, भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणी आपापल्या कार्यकर्त्यांना बोलावून घेत शक्तिप्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भाजपचे कर्जत विधानसभा मतदारसंघाचे मुख्यालय नक्की कोणते? हा प्रश्न महायुतीला सतावणार आहे हे नक्की.

मावळ लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर झाल्यावर खा. श्रीरंग बारणे कर्जत तालुक्यात आले. त्यांनी सूचना केल्यानुसार शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आरपीआय आठवले गट आणि भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बैठकांचे नियोजन केले. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठक नियोजित स्थळी आणि त्या त्या पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झाल्या. मात्र, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते हे तीन वेगवेगळ्या ठिकाणी थांबून राहिले होते. श्रीरंग बारणे हे माजी आमदार सुरेश लाड यांना लग्न सोहळ्याला जायचे असल्याने त्यांच्या भेटीसाठी प्रथम लाड यांच्या कार्यलयात पोहोचले. तेथे भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, भाजप तालुकाध्यक्ष राजेश भगत, किसान मोर्चा जिल्हा अध्यक्ष तसेच महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष यांच्यासह माजी नगराध्यक्ष यांची उपस्थिती तेथे होती. त्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा करून श्रीरंग बारणे हे भाजप प्रदेश प्रतिनिधी सुनील गोगटे यांच्यासोबत निघाले.

सुनील गोगटे यांच्या कर्जत शहरातील विठ्ठलनगर येथील संपर्क कार्यलयात भाजप महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष, किसान मोर्चा जिल्हा अध्यक्ष, तालुका अध्यक्ष तसेच भाजप सोशल मीडिया जिल्हा संयोजक यांची उपस्थित होती. या भेटीनंतर आरपीआय आठवले गटाचे कार्यकर्ते थांबले आहेत याचा विसर पडला आणि उमेदवार श्रीरंग बारणे हे भाजप विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्या कार्यालयात पोहोचले. तेथे किरण ठाकरे यांच्यासह भाजप जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर,भाजप तालुका सरचिटणीस संदीप म्हसकर,भाजप तालुका उपाध्यक्ष अनिल जैन तसेच युवा मोर्चा तालुका ध्यक्ष प्रज्ञेश खेडकर आदींसह भाजपचे बूथ कार्यकर्ते उपस्थित होते. त्या ठिकाणी खासदार आणि उमेदवार श्रीरंग बारणे यांनी पत्रकारांना बाईट देखील दिल्या.

दरम्यान, कर्जत विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार भाजपच्या नक्की कोणत्या कार्यालयात जाऊन कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेणार आणि प्रचाराचे नियोजन करणार? याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

# नागोठण्यात पाचवा कीर्तन महोत्सव उत्साहात



**। नागोठणे । वार्ताहर ।**


पंढरीचा पांडुरंग, महावैष्णव ज्ञानेश्वर माऊली, संतश्रेष्ठ जगत्गुरु तुकाराम महाराज आणि सकल संतांच्या कृपेने व सद्गुरुंच्या आशीर्वादाने चाळीसगाव वारकरी सांप्रदाय, नागोठणे विभाग यांच्या वतीने नागोठण्याची ग्रामदेवता जोगेश्वरी मातेच्या प्रांगणात १० व ११ एप्रिल रोजी आयोजित केलेला पाचवा कीर्तन महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. चाळीसगाव वारकरी सांप्रदायाचे संस्थापक रायगडभूषण दळवी गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली या दोन दिवसांच्या भरगच्च सोहळ्यात विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा सांप्रदायाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कीर्तन महोत्सवची सुरुवात बुधवारी (दि.१०) सकाळी ९ वा. वांगणी येथील कांचन ठाकूर व स्मिता कांचन ठाकूर यांच्या हस्ते कलश पूजन व ध्वजारोहण करुन झाली. त्यानंतर श्री ज्ञानेश्वरी पूजन, नंतर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या ९ व्या व १२ व्या अध्यायचे पारायण, सायंकाळी नागोठणे विभागातील चाळीसगाव वारकरी सांप्रदायाचे सामुदायिक हरिपाठ होऊन रात्री ७ वाजता सामाजिक कार्यकर्ते प्रसाद भोईर यांच्या सौजन्याने कीर्तनकार तसेच झी टॉकिज फेम कीर्तन केसरी गहिनीनाथ महाराज खेडेकर (पारगाव, जि. बीड) यांच्या प्रबोधनपर कीर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला.

या कीर्तन महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी गुरुवार, दि. ११ मे रोजी सकाळी दहा वाजता वाणीभूषण, संस्कृत पंडित, आळंदी येथील डॉ. हरिदास महाराज पालवे शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाल्यानंतर महाप्रसादाने या कीर्तन महोत्सवाचा समारोप करण्यात आला.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या-कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

# अपघातग्रस्तांसाठी वेळीच मदत

**। रसायनी । वार्ताहर ।**



मुंबई-गोवा महामार्गावर कर्नाळा खिंड, क्षणभर विश्रांती हॉटेल शेजारी दुचाकी चालक अनिल कोंडिलकर या चालकांचा बाईक घसरून भीषण अपघात घडला. या अपघातात बाईक चालकाच्या डोक्याला/डोळ्याला जबर मार लागला. या अपघाताची माहिती हेल्पलाईनवर मिळतात कर्नाळा खिंड येथील जगदगुरु नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान नानिजधाम रुग्णवाहिका अपघातग्रस्ताच्या मदतीला तातडीने घटनास्थळी दाखल होऊन जखमीला पुरोहित हॉस्पिटल येथे दाखल केले. सदर अपघात चालकास डॉक्टर उपचार सुरु झाले.

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या ५२ ॲम्ब्युलन्स विनामूल्य अपघातग्रस्तांच्या सेवेमध्ये असून, आतापर्यंत या सेवेतून २१,००० हून अधिक अपघातग्रस्तांचे प्राण त्यांना वेळीच हॉस्पिटलमध्ये दाखल करून वाचविण्यात आले आहेत..

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या उत्तर रायगडमधील पळस्पे फाटा येथील ॲम्ब्युलन्स ठिकाणामध्ये बदल करून कर्नाळा खिंड, विठ्ठल कामत हॉटेल बाजूला उभी करण्यात आली आहे. महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या विनामूल्य सेवेसाठी ८८८८२६३०३०/८३२९४२५९०८ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# रसायनीत जनजागृती रॅली

**। रसायनी । वार्ताहर ।**

गुढीपाडव्यानिमित्त रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा व ब्रम्हकुमारी कामोठे सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रग्ज, दारू, धूम्रपान, मोबाईल आदी विविध व्यसनांबाबत जनजागृतीसाठी व्यसनमुक्ती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

तरुणांमध्ये वाढत्या अंमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेबाबत जनजागृती करण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत एक हजारहून अधिक लोक सहभागी झाले होते. तसेच सहभागींनी अशी शपथ घेतली की ते ड्रग्जच्या आहारी जाणार नाहीत आणि कुटुंबातील सदस्य आणि मित्रांनादेखील या व्यसनापासून परावृत्त करतील. सर्व वयोगटातील आणि पार्श्वभूमीच्या लोकांनी एकत्र येऊन या रॅलीला चांगली उपस्थिती लावली होती. ब्रह्मकुमारीच्या वतीने व्यसनमुक्तीवर पथनाट्य आयोजित करण्यात आले होते .

या कार्यक्रमाला नेरुळ येथून ब्रह्माकुमारी निर्मला, खारघर येथून ब्रह्माकुमारी विद्या, तळोजे येथून ब्रह्माकुमारी वैशाली, कामोठे सेंटर इंचारज ब्रह्माकुमारी चित्र, रोटरी क्लब रसायनी पाताळगंगाच्या अध्यक्षा रेश्मा कुरूप, सुनील कुरूप आदी हॉस्पिटल आणि स्किनोम क्लिनिकच्या इंचार्ज डॉक्टर शीतल गोसावी व त्यांचे हॉस्पिटल स्टाफ उपस्थित होते.

डॉ. शीतल गोसावी यांनी हॉस्पिटल स्टाफ आणि ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल अध्यक्ष रेश्मा कुरूप यांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

# प्रणव गायकवाड एमबीबीएस

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आसल या गावातील रहिवासी असलेले सुनील गायकवाड यांचे सुपुत्र प्रणव यांनी मेडिकल शिक्षण पूर्ण केले आहे. एमबीबीएस ही पदवी प्राप्त करून यश संपादन केले असून, त्यांनी शिक्षण घेतलेल्या केईम रुग्णालयात इंटरशिप करण्याची संधी मिळाली आहे.



प्रणवने नेरळ गावातील एल ए ई एस इंग्लिश स्कूलमध्ये पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले. दहावीच्या शालांत परीक्षेत ९६ टक्के गुण मिळवून कमलादेवी देवी महाविद्यालय कल्याण येथे अकरावी-बारावीचे शिक्षण घेतले. बारावीच्या परीक्षेत ८७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला, तर मेडिकल शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेली नीट परीक्षा ५४७/७२० पैकी गुण मिळवून यशस्वीपणे पार पाडली. मुंबई येथील केईएम वैद्यकीय महाविद्यालय प्रवेश मिळविला आणि २०२४ मध्ये एमबीबीएस ही पदवी मिळविली.

ग्रामीण भागातील पहिलाच एमबीबीएस विद्यार्थी असल्याने प्रणव गायकवाड यांचे कौतुक होत आहे.

# मोठे शहापूर येथील रितेश गावंड बेपत्ता

**भाकरवड :** पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मोठे शहापूर येथील रितेश हासू गावंड (३७) मंगळवार, दि. २ एप्रिल रोजी घरातून नारंगी येथे जातो असे सांगून निघून गेला असून, तो अद्याप घरी परतलेला नाही. याबाबत रेश्मा प्रल्हाद मोकल (४३) यांनी पोयनाड पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली आहे. रितेश गावंड याची उंची ५ फुट ७ इंच, अंगाने मध्यम, चेहरा-उभट, मिशी- जाड, अंगात शेवाळी फुल हाताचा शर्ट व काळी फुलपॅन्ट याप्रमाणे वर्णन आहे. या इसमाबाबत कोणास अधिक माहिती असल्यास त्यांनी पोयनाड पोलीस ठाणे फोन नं. ०२१४३-२५२०६६ किंवा ९११२०६०२५९ यांच्याशी संपर्क साधावा.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सोमनाथ केशव पाटील, रा. मलंग वाडी, ता. अंबरनाथ, कुंभार्ली, ठाणे, ४२१३०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कुंडलज, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार ( रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ४४/४/अ | ०.११.६०<br>०.००.८०<br>एकूण ०.१२.४० | १.२० | श्री. गणेश हिरू भगत |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १२/०४/२०२४.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो. नं. ७३८५००४८०६.

### जाहीर नोटीस

दि. १२-०४-२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक नंदा बाळाराम जुईकर यांनी सदर नोटीस नमुद संपुर्ण मिळकत विक्री करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| शहाबाज, ता. अलिबाग | ६८६ | ०-४१-५० | ४-६९ |

वरील नमुद संपुर्ण मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करुन घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यांत येत आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून नमुद मिळकतीचे विद्यमान मालक हे सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागावुन येणाऱ्या हरकती विद्यमान मालक तसेच मिळकत खरेदी करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**ॲड. मोहीनेश मनोहर ठाकूर**
मोबा नं. ७०५७९०६८१८/८०८००१९११५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही १) खुशनुमा होशांग बेहराम व २) रूसी होमी पोस्टवाला, रा. मुंबई ज्यांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या व यापुढे 'सदर मिळकत'असे संबोधण्यात आलेल्या मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत, त्या मिळकतींचे मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मिळकतींचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका अलिबाग जिल्हा निबंधक रायगड दुय्यम निबंधक अलिबाग यांचे अधिकार क्षेत्रातील जिल्हा परिषद रायगड पंचायत समिती अलिबाग स्थानिक ग्रुपग्रामपंचायत कामार्लेचे हद्दीतील मौजे वाघोलीवाडी येथील खालील वर्णनाची एकजिनसी व खुली व खुद्द मिळकत.

| मौजे | गट नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| वाघोलीवाडी | ५६/१ | ०-७०-००<br>पो. ख. ०-०८-००<br>०-७८-०० | १२.०० |

तसेच त्यामध्ये असलेल्या ग्रुपग्रामपंचायत कामार्ले घर नं. १२१ अ व १२१ ब या घर मिळकती.

अलिबाग
तारीख : १२/४/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राहमणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### नोटीस

दिनांक १२/०४/२०२४

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे, बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक कै. प्रभावती महादेव पाटील यांचे कायदेशिर वारस १) श्री. यशवंत महादेव पाटील, २) श्री. दिलिप महादेव पाटील, ३) श्री. संदिप महादेव पाटील, ४) श्री. दिनेश महादेव पाटील, ५) श्री. महेश महादेव पाटील, ६)विद्या हरेश पाटील (लग्नानंतरचे नाव - सौ. हेमांगी हरिश्चंद्र पाटील), ७) मेघा रमेश म्हात्रे (लग्नानंतरचे नाव - सौ. रंजना रमेश म्हात्रे) यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी होवून करारनामा झालेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे बेलकडे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बेलकडे ता. अलिबाग | ७१ | जिरायत ०.०८.००<br>पो.ख. ०-००-१०<br>एकूण क्षेत्र ०-०८-१० | १.६८ |

दिनांक :- ०५/०३/२०२४
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग,
मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज जवळ
अलिबाग-रायगड मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीनें कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. राजेंद्र लक्ष्मण पालकर, आणि सौ. कविता राजेंद्र पालकर, रा. उद्यमनगर-कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक हिराबाई भिकू वाजंत्री, प्रकाश भिकू वाजंत्री, संतोष भिकू वाजंत्री, जयमाला जनार्दन पाटील, अंजना सुधीर म्हात्रे, सर्व रा. कोकबन, ता. रोहा, जि. रायगड यांचे कडुन कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता मिळकतीचा सर्च देणेंचा आहे तसेच तद्नंतर खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणेंचा आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | एकूण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| कोकबन, ता. रोहा जि. रायगड | ३७१ | ०-५८-९०<br>०-०४-१०<br>०-६३-०० | १-०६ |

सदरहू मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. तरी देखील वर नमूद मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून त्याबाबत टायटल रिपोर्ट (सर्च) आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

ता. १२/०४/२०२४.

**ॲड. विजय वि. पाटील**
मु.F-१०४, ॲकॉन्स एन्क्लेव्ह, पहिला मजला,
ता. अलिबाग, जि. रायगड, (मोबाईल ०९७६७५२८८८०)

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, अनिरुद्ध अनंत कामतेकर, रा.अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दि. १/१/१९९५ रोजी मे. दुय्यम निबंधक, अलिबाग यांचेकडे दस्त नं. ९/१९९५ अन्वये नोंदणीकृत निवासी गाळा खरेदीचा करार करण्यात आला होता. परंतु सदरचा मूळ दस्त हा श्रीमती केसर शिवाजी शिंदे यांचेकडून गहाळ झालेला आहे.

दिनांक : /०४/२०२४

टिप- सदर वर नमुद मुळ दस्त कोणासही आढळून आल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

सही / -
**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

### PUBLIC NOTICE

General Public is made aware that my clients Aniruddha Anant Kamtekar, R/at. Alibag, Tal. Alibag, Dist. Raigad duly registered Agreement for Sale at Sub Registrar, Alibag-Raigad Reg. No. 9/1995, Dt.1/1/1995 lost by Smt. Kesar Shivaji Shinde.

Note - If anyone finds the original documents mentioned above, please contact the following address.

**Adv. Vivek R. Salvi**
Opp. Sub Registrar, Alibag,
Shop No.5, Tal. Alibag, Dist. Raigad

### जाहीर नोटीस

दि.११/०४/२०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे यशवंतखार, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्री.विलास वसंत दिवकर यांच्याकडून आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची भातशेती मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| यशवंतखार, ता. रोहा | ९५ | जिरायत ०-७६-१०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकुण ०-७७-९० | १०.८५ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदर मिळकत ही कुळ कायद्याची मिळकत असून निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस हमी दिलेली आहे. तरी या उपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट ताबाकब्जा, इजमेंट, साठेकरार खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही तोंडी किंवा लेखी व्यवहाराचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन १४ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदरहू नोटीस कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणून प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सही/-
**ॲड. अविनाश यशवंत भगत**
मु. डोंगरी, पो. शेणवई,
ता. रोहा, जि. रायगड. मोबा.नं. ७०३०२८८६३९

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे, भोईघर, ता. मुरूड, जि. रायगड येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) सौ. दिपाली राजेश्वर खारकर, २) श्री. राजेश्वर गजानन खारकर यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/ गहाण इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे भोईघर, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| भाईघर ता. अलिबाग | ११३ | जिरायत ०-३५-१०<br>पो.ख. ०-००-२०<br>**एकूण क्षेत्र ०-३५-३०** | ३.४४ |

वर नमूद मिळकतीपैकी १) सौ. दिपाली राजेश्वर खारकर, २) श्री. राजेश्वर गजानन खारकर यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२०-०० हे. आर., आकार ३.१० रू. पै.

दिनांक :- १२/०४/२०२४
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-
रायगड मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

दि. ११/०४/२०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे सानेगाव, ता. रोहा, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विदयमान मालक श्री. नंदकुमार जानू दिवकर व इतर यांच्याकडून आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची जिरायत व वरकस मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| सानेगाव, ता. रोहा | ३०८ | जिरायत ०-८७-००<br>वरकस ०-१५-२०<br>पो.ख. ०-०९-५०<br>एकुण १-११-७० | १८.६ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदर मिळकत अविभाज्य सत्ता प्रकाराची असून सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विदयमान मालकांनी आमचे अशिलांस हमी दिलेली आहे. तरी या उपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट ताबाकब्जा, इजमेंट, साठेकरार खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही तोंडी किंवा लेखी व्यवहाराचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन १४ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदरहू नोटीस कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणून प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सही/-
**ॲड. अविनाश यशवंत भगत**
मु. डोंगरी, पो. शेणवई, ता. रोहा, जि. रायगड.
मोबा.नं. ७०३०२८८६३९

## निवडक

### दिग्गज क्रिकेटपटूचे निधन

**वेलिंग्टन :** क्रिकेट चाहत्यांसाठी ही दुःखद बातमी न्यूझीलंडमधून आली आहे. न्यूझीलंडचा माजी लेगस्पिनर जॅक अलाबास्टर यांनी वयाच्या ९३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. १९५५ ते १९७२ दरम्यान २१ कसोटी सामन्यामध्ये ते आपल्या देशासाठी खेळले, ज्यात त्यांनी ४९ विकेट घेतल्या. या कालावधीत न्यूझीलंड संघाने ४ कसोटी सामने जिंकले होते, जॅक अलाबास्टर देखील या विजयी संघाचा एक भाग होता. त्यांनी १९५५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध डेब्यू सामना खेळला होता.

### गिल भडकला पंचांवरच

**जयपूर :** गुजरातचा कर्णधार शुभमन गिल हा सामना सुरु असतानाच मैदानातील पंचांवर भडकल्याचे पाहायला मिळाले. राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसन हा फलंदाजी करत होता. त्यावेळी गुजरातचा मोहित शर्मा हा गोलंदाजी करत होता. मोहितने यावेळी चेंडू संथ गतीने टाकला. त्यानंतर पंचांनी मोहितचा हा चेंडू वाईड असल्याचा निर्णय दिला. त्यावेळी गिल हा पंचांवर चांगलाच भडकला. हा चेंडू वाईड कसा काय देऊ शकतो, यावर गिल पंचांशी भांडत होता. त्यानंतर गिलने यावेळी रीव्ह्यू घ्यायचे ठरवले. त्यामुळे टीव्ही अंपायरकडे हा निर्णय गेला.

### सॅमसनला मोठा धक्का

**जयपूर :** राजस्थान संघाला आयपीएलमध्ये गुजरातविरुद्धच्या पराभवानंतर कर्णधार संजू सॅमसनला एक मोठा झटका बसला. स्लो ओव्हर रेटमुळे त्याला बीसीसीआयकडून लाखो रुपयांच्या दंडाला सामोरे जावे लागले. या सामन्यात राजस्थानने आपली २० षटके वेळेवर पूर्ण करू शकला नाही, ज्यामुळे शेवटच्या षटकात ३०-यार्ड सर्कलच्या बाहेर ५ ऐवजी फक्त ४ क्षेत्ररक्षक उभे करता आले. सामना संपल्यानंतर संजू सॅमसनला स्लो ओव्हर रेटच्या चुकीमुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने १२ लाखांचा दंड ठोठावला.

### भारतीय खेळाडूंचा दबदबा

**नवी दिल्ली :** आयपीयलच्या सतराव्या हंगामात ऑरेंज कॅपसाठी मोठी लढत पाहायला मिळत आहे. सध्या ऑरेंज कॅपच्या शर्यतीत विराट कोहली पहिल्या क्रमांकावर आहे. दूसऱ्या क्रमांकावर राजस्थान रॉयल्स संघाचा अष्टपैलू खेळाडू रियान पराग आहे. तिसऱ्या क्रमांकावर गुजरात टायटन्स संघाचा कर्णधार शुभमन गिल आहे. त्यानंतर राजस्थान रॉयल्स संघाचा कर्णधार संजू सॅमसन चौथ्या क्रमांकावर आहे तर गुजरात टायटन्सचा साई सुदर्शन पाचव्या क्रमांकावर आहे.

### विराट,फाफचे अपयश

**मुंबई :** आरसीबीची सलामी जोडी यंदाच्या हंगामात आपली जादू दाखवू शकलेली नाही. फाफ ड्युप्लेसिस सध्या आऊट ऑफ फॉर्म आहे. तर, विराट कोहली ज्या स्ट्राईक रेटने धावा करतोय त्याचा फायदा संघाला होताना दिसत नाहीये. ड्युप्लेसिसने आतापर्यंत हंगामात फक्त १०९ धावा केल्या आहेत. त्याचं टी-२० क्रिकेटमधील स्ट्राईक रेट हे १३३.६७ इतके आहे. विराट कोहलीने यंदाच्या हंगामात धावांचा पाऊस पाडला आहे. मात्र, स्टाईक रेटच्या बाबतीत तोही मार खाताना दिसतोय.

---

### चौलमळा क्रिकेट लीग स्पर्धा

# रिया टायगरचा विजेतेपदावर कब्जा

## काव्या चॅलेंजरर्सला उपविजेतेपद

**। चौल । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील चौलमळा क्रिकेट संघ आयोजित मर्यादित षटकांची टेनिस क्रिकेट स्पर्धा रविवारी (दि.७) दिमाखात पार पडली. या स्पर्धेचा अंतिम सामना संघमालक सचिन आमरे यांच्या रिया टायगर आणि संघमालक शैलेश नाईक यांच्या काव्या चॅलेंजरर्स या संघांदरम्यान झाला. रिया टायगरच्या साईप्रसाद पडवळची अष्टपैलू कामगिरी आणि अष्टपैलू खेळाडू तुषार पाटील याने विजयी फटका लगावत चौलमळा क्रिकेट लीग स्पर्धेच्या पहिल्या पर्वाच्या चषकावर नाव कोरले. विजयाचा शिल्पकार ठरलेल्या साईप्रसादला सामनावीरासह मालिकावीराचा किताब देऊन गौरविण्यात आले.**



चौलमळा क्रिकेट संघातील खेळाडूंच्या संकल्पनेतून पहिल्यांदाच ही स्पर्धा चौल-पाझर येथील मैदानावर खेळविण्यात आली. गावातील तरुण पिढीमध्ये एकोपा व एकमेकांबद्दल जिव्हाळा राहावा, हीच या स्पर्धेमागची भावना होती. या स्पर्धेचे उद्घाटन चौलमळा गावप्रमुख रवींद्र घरत, कृष्णादेवी युवक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र नाईक यांच्या हस्ते पार पडले. यावेळी चौल ग्रामपंचायतीचे सदस्य शशिकांत म्हात्रे, गावाचे उपप्रमुख जितेंद्र पाटील, खजिनदार अल्पेश घरत, सहसचिव योगेश जाधव, रवींद्र नाईक, वामन घरत, प्रभाकर नाईक, दत्तात्रय जाधव, सुनील घरत, विलास शिवलकर, भजन मंडळाचे अध्यक्ष तथा युवक मंडळ उपाध्यक्ष अल्पेश म्हात्रे, भजन मंडळ उपाध्यक्ष अंजेश घरत, अनंत म्हात्रे, अनिल नाईक, विनायक थळकर, रवींद्र पाटील, पांडुरंग पाटील, अनिता पाटील, जनार्दन नाईक, अशोक पाटील आदी प्रतिष्ठित ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. ही स्पर्धा चौलमळा गावापुरती मर्यादित होती. स्पर्धेत सहा संघांचा समावेश होता.

आयपीएलच्या धर्तीवर प्रत्येक संघाची मालकी देण्यात आली होती. त्यात शैलेश नाईक संघमालक (काव्या चॅलेंजर्स), सुजित नाईक संघमालक (जित ट्रान्स्पोर्ट), मोहन घरत संघमालक (अलिबाग बीच कॅम्पिंग), सचिन आमरे संघमालक (रिया टायगर), मंदार नाईक संघमालक (श्री कृष्णादेवी प्रसन्न), सुनील घरत संघमालक (श्री माऊली केबल नेटवर्क) या संघांचा समावेश होता.

स्पर्धेतील अंतिम सामना रिया टायगर आणि काव्या चॅलेंजर्स यांच्यात झाला. तीन षटकांच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना काव्या चॅलेंजर्सने २७ धावांचे आव्हान ठेवले होते. प्रत्युत्तरात रिया टायगरचे सलामीवीर साईप्रसाद पडवळ आणि अभिषेक घरत यांनी काव्या चॅलेंजर्सच्या गोलंदाजी फोडून काढत अवघ्या दोन षटकातच संघाला विजयाच्या जवळ नेले. दरम्यान, सलामीवीर अभिषेक बाद झाल्यानंतर मैदानात उतरलेल्या तुषार पाटील याने विजयी फटका लगावत रिया टायगरच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. विजेत्या रिया टायगरला ६६६६ रोख व चषक, तर उपविजेत्या काव्या चॅलेंजर्सला ४४४४ रोख व चषक तसेच तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या श्री माऊली केबळ नेटर्क संघाला २२२२ रोख व चषक देऊन गावचे प्रमुख रवींद्र घरत, जितेंद्र घरत, युवक मंडळ अध्यक्ष महेंद्र नाईक यांच्या हस्ते गौरविण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाज म्हणून साईप्रसाद पडवळ याला गौरविण्यात आले. स्पर्धेत पंच म्हणून दिपक लाड, प्रज्ञेश पाटील, राजेंद्र पाटील यांनी काम केले. समालोचक म्हणून शशिकांत म्हात्रे, सुशांत शिवलकर, योगेश जाधव यांनी, धावफलक मांडणीचे महत्त्वपूर्ण काम विजय सातांबेकर आणि सिद्धेश लोहार यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजक चौलमळा क्रिकेट संघाचे अनिकेत म्हात्रे, जयेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य सहकाऱ्यांनी मेहनत घेतली.

### खेळाडूंवर बक्षिसांची खैरात

**मोहन घरत यांच्याकडून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे चषक, स्व. उदय मोरे यांच्या स्मरणार्थ साधना वामन घरत यांच्याकडून प्रथम क्रमांकासाठी, रवींद्र दत्तात्रेय नाईक द्वितीय क्रमांकासाठी, तर तृतीय क्रमांकासाठी स्व. प्रशांत लाड यांच्या स्मरणार्थ अस्मिता निलेश घरत यांच्याकडून रोख रकमेचे पारितोषिक देण्यात आले. अजित नाईक (कृष्णाई जनरल स्टोअर) सामनावीरांचे चषक, निलेश मोरे मालिकावीर चषक, शशिकांत म्हात्रे उत्कृष्ट फलंदाज व गोलंदाजासाठी चषक आणि मालिकावीरासाठी सायकल पारितोषिक देण्यात आली.**

---

## विश्वचषकातून जैस्वालचा पत्ता कट?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक २०२४ साठी भारतीय क्रिकेट संघाची लवकरच घोषणा केली जाऊ शकते. या निवडीत आयपीएल २०२४ मधील खेळाडूंची कामगिरीही महत्त्वाची ठरणार आहे.

दरम्यान, आयपीएलचा २४वा सामना राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळला गेला. खराब फॉर्मशी झगडत असलेला यशस्वी जैस्वाल या सामन्यात चांगली कामगिरी करेल, अशी चाहत्यांना आशा होती, मात्र तसे झाले नाही. यशस्वी जैस्वाल गुजरातविरुद्ध २४ धावा करून बाद झाला. त्याला उमेश यादवने आऊट केले. आतापर्यंतचा हा हंगाम यशस्वीसाठी खूपच खराब गेला आहे. त्याने त्याच्या पहिल्या पाच सामन्यांमध्ये फक्त ६३ धावा केल्या आहेत. ज्यात २४ धावा हा त्याचा सर्वोत्तम धावसंख्या आहे.



बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी आधीच घोषणा केली होती की, रोहित शर्मा टीम इंडियाचा कर्णधार असेल आणि अशा परिस्थितीत तो सलामीवीर राहील. आता त्याचा जोडीदार कोण असेल हा प्रश्न आहे.

## पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित इंटर अकॅडमी क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न

**। पनवेल । क्रीडा प्रतिनिधी ।**

पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित व लावास लुब्रिकन्ट्स पुरस्कृत इंटर अकॅडमी लेदर बॉल ज्युनियर वयोगटातील क्रिकेट स्पर्धा रसायनी पाताळगंगा येथील नेशनल इंस्टीट्यूट ऑफ सिक्योरिटीज मार्केट्सच्या मैदानावर उत्साहात संपन्न झाली. पीसीएसए फायटर्र्स, सुपर किंग्स आणि मावेरीक्स अश्या तीन संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. प्रथम साखळी व नंतर बाद फेरीनुसार स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पीसीएसए मावेरीक्स संघांने पीसीएसए फायटर्स संघावर मात करत अंतिम विजयी होण्याचा मान मिळवला आहे.



अकॅडमितील युवा व होतकरू क्रिकेटखेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने स्पर्धा आयोजित करण्यात आली. संपूर्ण स्पर्धेत उत्तम कामगिरी करणाऱ्या देव सिंग याला मालिकावीर, उत्कृष्ठ फलंदाज व अंतिम सामन्यातील सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. तर, उत्कृष्ठ गोलंदाज अर्जुन राव व उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक आयुष पाटील, प्रज्वल पराडकर, फायटर खेळाडू तन्मय पोपेटा यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमासाठी रतन खारोल, प्रशिक्षक सागर कांबळे, अँड. पंकज पंडित, अभिजित वाडकर, आदेश नाईक सह अकॅडमीचे पालक व खेळाडू उपस्थित होते.

## पांड्याच्या भावाला अटक

**मुंबई :** मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याच्या सावत्र भावाला अटक करण्यात आली आहे. हार्दिक आणि कृणाल पांड्या या दोघांची फसवणूक केल्याप्रकरणी त्याचा सावत्र भाऊ वैभव पांड्याला अटक करण्यात आली आहे. हार्दिकच्या सावत्र भाऊवर ४.३ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप आहे, असे मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. २०२१ मध्ये तिघांनी मिळून पॉलिमर व्यवसाय सुरू केला होता. हार्दिक आणि कृणाल दोघांकडे ४०% शेअर्स तर वैभवकडे उर्वरित २०% शेअर्स होते.

## ‘आरआयपी पाकिस्तान क्रिकेट’ मोहम्मद हाफीजच्या पोस्टने खळबळ



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचा माजी क्रिकेटर मोहम्मद हाफीज एका सोशल मीडिया पोस्टमुळे चर्चेत आला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी संघाची घोषणा केली, ज्यामध्ये मोहम्मद आमिर आणि इमाद वसीम त्यांनाही स्थान मिळाले आहे. बाबर आझमकडे संघाचे कर्णधारपद मिळाल्यानंतर प्रथमच पाकिस्तान संघ मालिका खेळणार आहे. या संघाची घोषणा झाल्यानंतर पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद हाफीजने एक्सवर लिहिले की, ‘आरआयपी पाकिस्तान डोमेस्टिक क्रिकेट.’ यावरून हाफीजने पाकिस्तान क्रिकेट बोर्डावर निशाणा साधल्याचे स्पष्ट आहे.

---

## क्रिकेटच्या महाकुंभाचा बिगुल वाजला

### आठ ठिकाणी रंगणार विश्वषकाचा थरार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिकेत २०२७ मधील एकदिवसीय विश्वकरंडकाचे आयोजन करण्यात येणार असून या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील स्थळांवर यजमान मंडळाकडून बुधवारी (दि.१०) शिक्कामोर्तब करण्यात आले. जोहान्सबर्गमधील वंडरर्स, डर्बनमधील किंग्समीड, केपटाऊन मधील न्यूलँडस् यासह एकूण आठ ठिकाणी या स्पर्धेच्या लढतींची रंगत पाहायला मिळणार आहे.

दक्षिण आफ्रिकन क्रिकेट मंडळाचे विशेष कार्यकारी अधिकारी फोलेत्सी मोसेकी यांच्याकडून सांगण्यात आले की,




आयसीसीकडून आम्हाला ११ स्थळांचे प्रमाणपत्र मिळालेले आहे; पण हॉटेल रूम व विमानतळावर लक्ष देता तीन स्थळांवर लढती न खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वंडरर्स, किंग्समीड, न०यूलँडस्, सेंच्युरियन पार्क, सेंट जॉर्ज पार्क, बोलंड पार्क, ब्लोमफाँटेन, बफेलो पार्क या आठ स्थळांना लढतींसाठी निश्चित

**स्पर्धेचे स्वरूप**

- १४ देशांचा सहभाग
- आठ देश आयसीसी क्रमवारीनुसार थेट पात्र
- दोन यजमान देशही थेट पात्र (नामिबिया वगळता)
- प्रत्येकी सात देशांचे दोन गट
- सर्वोत्तम तीन संघ सुपरसिक्स फेरीसाठी पात्र ठरणार
- उपांत्य फेरी व अंतिम फेरीच्या लढती

## सुवर्णपदक जिंकणारे खेळाडू मालामाल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

यंदाच्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये ॲथलेटिक्समध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या ॲथलिट्ला रोख पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा ऐतिहासिक निर्णय जागतिक ॲथलेटिक्स संघटनेने घेतला आहे. बुधवारी या निर्णयाची घोषणा करण्यात आली. जागतिक ॲथलेटिक्स संघटना असा निर्णय घेणारी पहिली आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटना ठरली आहे.

प्रत्येक चार वर्षांनी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीकडून मिळणाऱ्या वाट्यातून तब्बल २.४ लाख अमेरिकन डॉलर्सचे एकूण पुरस्कार देण्यात येणार आहे. पॅरिसमध्ये ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारात एकूण ४८ इव्हेंट होणार असून त्यातील प्रत्येक सुवर्णपदक विजेत्याला अनुक्रमे ५० हजार अमेरिकन डॉलर्सचा रोख पुरस्कार मिळेल. भविष्यात यात वाढ होऊ शकते, तसेच, २०२८ च्या लॉस एंजल्स ऑलिंपिकमध्ये रौप्य व ब्राँझपदक विजेत्यांनाही रोख पुरस्कार देण्यासाठी जागतिक ॲथलेटिक्स संघटना कटिबद्ध आहे.

## पी.व्ही. सिंधूची विजयी सलामी

**। निंगबो । वृत्तसंस्था ।**

स्टार खेळाडू पी.व्ही. सिंधू हिने आशियाई बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरी विभागात दमदार कामगिरी करताना मलेशियाच्या गोह जिन वेई हिच्यावर तीन गेममध्ये विजय मिळवत पुढे पाऊल टाकले. मात्र, पुरुषांच्या विभागात लक्ष्य सेन, किदांबी श्रीकांत, एच.एस. प्रणोय व प्रियांशू राजवत या चारही खेळाडूंना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे भारतीयांसाठी हा दिवस निराशाजनक ठरला.



आशियाई स्पर्धेतील या लढतीत सिंधूने कडव्या संघर्षानंतर विजयाला गवसणी घातली. मलेशियाच्या बॅडमिंटनपटूने पहिला गेम २१-१८ असा जिंकत १-० अशी आघाडी घेतली. मात्र, पुढील दोन गेममध्ये भारताच्या फुलराणीने झोकात पुनरागमन केले. तिने दुसरा गेम २१-१४ असा, तर तिसरा गेम २१-१९ असा जिंकला.

यामुळे सिंधूला पुढल्या फेरीत प्रवेश करता आला. पी. व्ही. सिंधूसमोर पुढल्या फेरीत चीनच्या हॅन युई हिचे आव्हान असणार आहे. सिंधूसाठी ही लढत सोपी असण्याची दाट शक्यता आहे. कारण याआधी झालेल्या पाचही लढतींमध्ये सिंधूने तिला पराभूत करण्याची किमया करून दाखवली आहे.

---

# माथेरानमध्ये कुस्त्यांचे आयोजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरानमध्ये दरवर्षी ग्रामस्थ मंडळाकडून वसंत उत्सव साजरा केला जातो. गुढी पाडव्यापासून सुरु होणार वसंतोत्सव हनुमान जंयतीपर्यंत चालतो. माथेरानमधील निसर्गात ज्याप्रमाणे बदल होतात आणि वसंत ऋत्यू सुरु झाल्याची चाहूल लागते, त्याप्रमाणे माथेरानमध्ये गुढी पाडव्याला कुस्त्यांचा फड रंगतो. मुंबई, पुण्यापासून कुस्तीगीर या फडामध्ये कुस्त्यांच्या सामान्यांसाठी उतरत असतात. यावेळी शहरातील श्रीराम मंदिर चौकातील मैदानावर कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते.**






गुढीपाडवा हा शुभ दिवस असल्याने महाराष्ट्रात सर्वत्र या हिंदू नववर्ष दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. ग्रामस्थ उत्सव मंडळातर्फे दरवर्षी श्रीराम मंदिर येथे जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते.

या कुस्त्यांकरिता कर्जत-खालापुर, पनवेल, कल्याण, डोंबिवली, पुणे, सातारा, कोल्हापुर येथुन कुस्ती खेळण्यासाठी पैलवान आले होते. या कुस्त्या पाहण्यासाठी माथेरानमधील नागरिकांनी गर्दी केली होती. मातीतील कुस्त्या आजही महाराष्ट्रात खेडोपाडी खेळल्या जातात. या स्पर्धांसाठी माथेरान ग्रामस्थ मंडळाचा पुढाकार होता. त्यात अध्यक्ष प्रकाश सुतार यांच्यासह मंगेश सकपाळ, अनंता शेलार, गिरीश पवार, प्रदीप घावरे, वसंत कदम, घावरे यांच्यासह माथेरान व्यापारी मंडळ अध्यक्ष राजेश चौधरी, माथेरानलॉजिंग बोर्डिंग अध्यक्ष कुलदीप जाधव, अश्वपाल संघटनेचे किरण चौधरी आणि प्रवीण सकपाळ यांचा या स्पर्धेसाठी प्रमुख पुढाकार होता.

सुरुवात लहान मुलांच्या कुस्त्यांपासून झाली. या कुस्त्यांमध्ये जिंकणाऱ्याला पाचशे रुपयांपासून पाच हजार रुपयांपर्यंत पारितोषिके देण्यात आली. लाल मातीतील कुस्तीमध्ये सर्वात मोठी कुस्ती ५४०० रुपयांची झाली.त्यात पुणे येथील विजय डोईफोडे आणि कोल्हापूर येथील अनिकेत पाटील यांच्यात झाली. पुणे येथील विजयने या मल्लाने अंतिम आणि मानाची कुस्ती जिंकली.

## ऑस्ट्रेलियाने पराभवाची चारली धूळ

### भारतीय संघाकडून कडवा संघर्ष

**। पर्थ । वृत्तसंस्था ।**

पहिल्या दोन लढतींत पराभूत झालेल्या भारतीय पुरुष हॉकी संघाने बुधवारी रंगलेल्या तिसऱ्या लढतीत यजमान ऑस्ट्रेलियन हॉकी संघाला कडवी झुंज दिली. जुगराज सिंगने पेनल्टी कॉर्नरवर केलेल्या गोलमुळे आघाडी घेतलेल्या भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून २-१ अशी हार पत्करावी लागली. हायवर्ड जेरेमी याने दोन गोल करीत ऑस्ट्रेलियाचा रोमहर्षक विजय निश्चित केला. ऑस्ट्रेलियन संघाने पाच सामन्यांच्या मालिकेत ३-० अशी आघाडी घेतली असून उर्वरित दोन लढती येत्या १२ व १३ एप्रिलला होणार आहेत.



ऑस्ट्रेलियाने पहिल्या लढतीत भारताचा ५-१ असा धुव्वा उडवला होता. त्यानंतर ४-२ अशा फरकाने भारताला हरवण्यात त्यांना यश मिळाले होते. मात्र, तिसऱ्या लढतीत पाहुण्या भारतीय संघाकडून कडवा संघर्ष पाहायला मिळाला. गोलरक्षक पी.आर. श्रीजेश व क्रिशन बहादूर पाठक यांनी या लढतीत ऑस्ट्रेलियाचे आक्रमण लीलया परतवून लावताना उल्लेखनीय कामगिरी केली. भारताने बचावात केलेल्या कौतुकास्पद प्रदर्शनाची झलक पाहायला मिळाली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)